




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २७० * नांदेड * शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## सीजेपी आंदोलनापूर्वीच दिल्लीच्या चौफेर नाकेबंदीची तयारी?

# दिल्लीला येणाऱ्या अनेक गाड्या मुळ स्थानकातून रद्द, ५७ मेट्रो स्थानके बंद

### पोलिसांनी १० छावण्या उभारल्या, सीजेपी कार्यकर्त्यांची देशव्यापी धरपकड

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दीन स्थानकांवर येणाऱ्या सर्व मेल आणि एक्सप्रेस गाड्या शनिवारी रद्द करण्यात येतील. रेल्वेने या गाड्या त्यांच्या मूळ स्थानकांवरूनच रद्द केल्या आहेत. सीजेपी आणि डाव्या विचारसरणीच्या संघटनांनी सरकारवर देशभरात समर्थकांना ताब्यात घेतल्याचा आरोप केला आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ५७ मेट्रो स्थानके बंद करण्याचा आणि १० नजरबंदी केंद्रे उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

कॉकरोच जनता पक्षाने सांगितले की, दिल्लीला जात असताना पुण्यातील विद्यार्थ्यांना वाटेतच ताब्यात घेण्यात आले. त्यांना बसने एका अज्ञात ठिकाणी नेण्यात आले. सीजेपीने मध्य प्रदेशातील एक व्हिडिओ देखील शेअर केला, ज्यामध्ये तरुण धावत्या बसमध्ये दिसत आहेत. एका तरुणाने दावा केला आहे की



त्याला मध्य प्रदेश पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दुसरीकडे, दिल्ली पोलीस हॉटेल्स आणि गेस्ट हाऊसमधील नोंदी तपासत आहेत. तेथे थांबलेल्या पाहुण्यांची ओळखपत्रे आणि माहिती बारकाईने तपासली जात आहे. संशयास्पद वाटणाऱ्या पाहुण्यांची थेट चौकशी केली जात आहे. ८ ते ११ ऑक्टोबर दरम्यान वास्तव्य केलेल्यांच्या नोंदींची छाननी केली जात आहे. गटागटाने आलेल्या लोकांवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. विशेषतः २० ते ३० वयोगटातील तरुणांना त्यांच्या दिल्ली प्रवासाविषयी विचारले जात आहे. जर दुसऱ्या कोणी खोली बुक केली असेल आणि तिथे दुसरे कोणी राहिले असेल, तर अशा प्रकरणांची कसून चौकशी केली जात आहे. हॉटेलच्या रजिस्टरमधून खऱ्या ओळखपत्रांची पडताळणी केली जात आहे. नवी दिल्लीकडे गर्दी जमू नये यासाठी बस ऑपरेटर आणि त्यांच्या बुकिंगवर लक्ष ठेवले जात आहे.

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी 'कॉकरोच पार्टी' १० ऑक्टोबर रोजी दिल्लीत आंदोलन करणार आहे. २ ऑक्टोबरच्या रात्री, दीपके यांनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले की, जर ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिला नाही, तर देशभरातील कॉकरोच दिल्लीत पोहोचतील. त्याने असेही म्हटले की, जर दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना जंतर मंतरपर्यंत पोहोचण्यापासून रोखले, तर त्यांना जिथे थांबवले जाईल तिथे जंतर मंतर उभारले जाईल.

## दिल्लीतील पाच मजली इमारत कोसळली; ४ जणांचा मृत्यू, ८ जखमी

**नवी दिल्ली (प्रतिनिध)–** दिल्लीतील न्यू सीमापुरी परिसरात पाच मजली इमारत कोसळल्याच्या घटनेत आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. या दुर्घटनेत ८ जण जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांचा शोध घेण्यासाठी सुमारे २८ तास बचावकार्य सुरू होते.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास न्यू सीमापुरी येथील अरुंद गल्ल्यांमध्ये ही इमारत कोसळली. या दुर्घटनेत इमारतीतील रहिवासी आणि जवळ उभे असलेले लोक अडकले होते. सुरुवातीला दोन मुले आणि २१ वर्षीय गर्भवती महिलेच्या मृत्यूची माहिती समोर आली होती. त्यानंतर ढिगाऱ्याखालून आणखी मृतदेह सापडल्याने मृतांचा आकडा चारवर पोहोचला. मृतांमध्ये तीन महिला आणि एका लहान मुलाचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# राज्यातील आणखी १८ तालुक्यांत दुष्काळाच्या तीव्रतेची प्रत्यक्ष पडताळणी होणार

### नांदेड जिल्ह्यातील मुदखेड, मुखेड तालुक्यांचा समावेश

**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे अधिक अचूक आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी शासनाने आणखी १८ तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या तीव्रतेची प्रत्यक्ष पडताळणी करण्यास मान्यता दिली आहे. या तालुक्यांतील प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण करण्यात येणार असून, उपग्रह छायाचित्रे व संगणकीय माहितीची प्रत्यक्ष क्षेत्रीय परिस्थितीशी पडताळणी केली जाणार आहे. यामुळे दुष्काळाच्या तीव्रतेचे वास्तव चित्र स्पष्ट होण्यास मदत होणार आहे. या पडताळणीत नांदेड जिल्ह्यातील मुदखेड, मुखेड तालुक्यांचा समावेश आहे

मंत्रिमंडळ उपसमितीच्या २९ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांनुसार जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीतील पर्जन्याची तूट आणि अन्य घटकांचा विचार करून आणखी १८ तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने दुष्काळी परिस्थितीचे अचूक मूल्यमापन करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत व सवलती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. खरीप हंगाम २०२६ मधील परिस्थितीच्या आधारे २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांत ट्रिगर-१ निकषांनुसार दुष्काळ जाहीर करून विविध १२ उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

मुदखेड, मुखेड, जिवती, ब्रह्मपुरी, बल्लारपूर, आमगाव, देवरी, सालेकसा, गोंदिया, कारंजा, मोहाडी, तुमसर, त्र्यंबकेश्वर, चांदवड, निफाड, पाटण, शिराळा, वाळवा या १८ तालुक्यांमध्ये पडताळणी करण्यात येणार आहे.उपग्रह छायाचित्रे, नकाशे आणि संगणकीय माहितीच्या आधारे प्राप्त झालेल्या निष्कर्षांची प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे खातरजमा केली जाणार आहे. प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण केल्यामुळे पिकांची प्रत्यक्ष स्थिती आणि दुष्काळाच्या तीव्रतेचे मूल्यमापन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. या प्रक्रियेमुळे तांत्रिक माहिती आणि प्रत्यक्ष शेतातील परिस्थिती यांची सांगड घालून दुष्काळाचे अधिक अचूक चित्र समोर येईल. परिणामी, दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यासाठी शासनाला वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध होणार आहे.

## भारतीय पर्यटकांसाठी २०२७ पर्यंत मलेशिया व्हिसामुक्त

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय पर्यटकांना डिसेंबर २०२७ पर्यंत मलेशियात व्हिसामुक्त प्रवास करता येणार आहे. भारतीय पर्यटकांची वाढती संख्या पाहता मलेशियाने व्हिसाला मुदतवाढ दिली आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत मलेशिया भारतीय पर्यटकांसाठी व्हिसा मुक्त आहे. ट्रॅव्हल फिनटेक कंपनी स्केपिया आणि टुरिझम मलेशिया यांनी 'मलेशिया कॉलिंग' ही चार महिन्यांची मोहीम सुरू करण्यासाठी भागीदारी केली आहे.

मलेशिया हे भारतीय आणि जगभरातील पर्यटकांचे एक अत्यंत आवडते आणि लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. आधुनिक शहरे, आकाशाला भिडणाऱ्या इमारती, शांत-सुंदर समुद्रकिनारे, प्राचीन वर्षावने आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा या सर्वांचा अप्रतिम मेळ मलेशियामध्ये पाहायला मिळतो. इतर आंतरराष्ट्रीय देशांच्या तुलनेत मलेशियाची सफर बजेटमध्ये आणि स्वस्त होत असल्याने अनेकांसाठी ती पहिली पसंती असते.

# मराठवाडा पदवीधर निवडणुकीत तिरंगी सामना; एका जागेसाठी ४१ उमेदवार मैदानात, १३ जणांची माघार

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत अखेर तिरंगी लढतीचं चित्र स्पष्ट झालं आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ५४ पैकी १३ उमेदवारांनी माघार घेतली असून, आता ४१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

या निवडणुकीत महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार सतीश चव्हाण, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिलीप घुगे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्यात प्रमुख लढत होणार आहे. भाजपचे एम. के. देशमुख यांनी अखेरच्या क्षणी माघार घेतल्याने महायुतीचं गणित सोप्पं झालं आहे. मात्र, महाविकास आघाडीतील उमेदवारीवरून असलेला तिढा कायम राहिल्याने आघाडीत बिघाडी झाल्याचं चित्र आहे.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली असून, आता प्रत्यक्ष लढतीचं चित्र स्पष्ट झालं आहे. एकूण ५४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १३ उमेदवारांनी माघार घेतल्याने आता ४१ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे या निवडणुकीत कोण बाजी मारणार, याकडे संपूर्ण मराठवाड्याचं लक्ष लागलं आहे.

या निवडणुकीत महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार सतीश चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र, भाजपचे एम. के. देशमुख यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केल्याने महायुतीसमोर पेच निर्माण झाला होता. देशमुख यांनी मैत्रीपूर्ण लढतीची मागणी भाजप नेत्यांकडे केली होती. मात्र, त्यात यश न आल्याने त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तासात माघार घेतली. त्यामुळे आता महायुतीकडून सतीश चव्हाण हेच प्रमुख उमेदवार असतील.

दुसरीकडे, महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेद मात्र दूर होऊ शकले नाहीत. या मतदारसंघाची जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मिळाल्याचं सांगत दिलीप घुगे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. त्यांनी निवडणुकीसाठी अर्जही दाखल केला. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून डॉ. प्रतापसिंह पाटील यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला. शेवटच्या दिवसापर्यंत त्यांनी माघार न घेतल्याने आता दोन्ही पक्षांचे उमेदवार निवडणुकीच्या मैदानात कायम आहेत.

त्यामुळे महायुतीतील उमेदवारीचा प्रश्न सुटला असला, तरी महाविकास आघाडीतील एकमताचा अभाव या निवडणुकीत महत्त्वाचा मुद्दा ठरण्याची शक्यता आहे. आता सतीश चव्हाण, दिलीप घुगे आणि डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्यात प्रमुख लढत होणार आहे.

# ३० ऑक्टोबरपर्यंत शिवसेनेची सुनावणी संपण्याचे संकेत

### शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या फायनल निकालाची तारीख ठरली

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणी सुनावणी याच महिन्यात पूर्ण होणार असल्याचं समोर आलं आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस निकाल अपेक्षित असल्याचं सांगितलं जात आहे. सुप्रीम कोर्टाने शुक्रवारी एका सुनावणी दरम्यान ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात शिवसेना चिन्ह आणि पक्ष प्रकरण संपणार असं तोंडी सांगितले.

एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये ऐतिहासिक बंड करत अखंड शिवसेनेतील ४० पेक्षा जास्त आमदार फोडले. यानंतर ठाकरे सेना आणि शिंदेंची शिवसेना यामध्ये पक्षाचं नाव आणि चिन्हावरुन जोरदार वाद सुरु आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि चिन्हाची अंतिम सुनावणी सुरु आहे.



शुक्रवारी सुप्रीम कोर्टात पश्चिम बंगाल एसआयआरची सुनावणी त्वरीत घ्यावी अशी विनंती वकीलांतर्फे करण्यात आली. त्यावेळी सुप्रीम कोर्टाने सांगितले की, ३० ऑक्टोबरपर्यंत शिवसेनेची सुनावणी संपवायची आहे. त्यानंतर बंगालमधील एसआयआरचे प्रकरण घेतले जाईल. त्यामुळे ३० ऑक्टोबरपर्यंत म्हणजेच दिवाळीआधी शिवसेना पक्ष आणि चिन्ह कुणाला मिळाणार, याबाबत समोर येणार आहे.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत गुरूवारी झालेल्या सुनावणीदरम्यान वकील नीरज किशन कौल यांनी निवडणूक आयोगाची निरीक्षणे आणि पक्षांतर्गत लोकशाहीवर भाष्य केलं. नीरज किशन कौल सुप्रीम कोर्टात युक्तीवाद करताना म्हणाले की, सुनावणीदरम्यान कौल म्हणाले की, १९९८ साली शिवसेनेला पत्राद्वारे कळवण्यात आले होते की पक्षातील नेमणुका या लोकशाहीच्या तत्त्वांना धरून नाहीत, ज्यावर शिवसेनेने आपले उत्तरही दिले होते.

## किनवटच्या न्यायालयाने महाघोटाळ्यातील आरोपींचा जामिन नाकारला

**किनवट (प्रतिनिधी)–** साडेसोळा कोटींच्या गैरव्यवहारप्रकरणात किनवटच्या दिवाणी न्यायालयाने न्यायालयीन कोठडीत असलेल्या सहा आरोपींचा जामीन फेटाळून लावला. त्यामुळे आरोपींच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

किनवटच्या आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील तब्बल १७ कोटींच्या गैरव्यवहारप्रकरणी नांदेडच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने दि. २१ ते ३० सप्टेंबर या कालावधीत एकूण ६ आरोपींना अटक केली होती.सहाही आरोपींना न्यायालयाने आधी दि. ३ ऑक्टोंबरपर्यंत कोठडी सुनावली होती. त्यानंतर सर्व आरोपींना दि.१६ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. दुसरीकडे आरोपींना जामीन मिळू नये यासाठी आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने न्यायालयात बुधवारी अहवाल सादर केला होता. आरोपींच्या आणि सहायक सरकारी वकिलांच्या जोरदार युक्तिवादानंतर दिवाणी न्यायाधीश प्रदीप माने यांनी शुक्रवारी सहायक सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरीत सर्व आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला आहे.

# ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्यासाठी 'इंडिया' आघाडी आक्रमक!

### द्रौपदी मुर्मू यांची भेट घेत राष्ट्रपती भवनात खासदारांचा ठिय्या

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** मतदार याद्यांमधील गैरप्रकार आणि 'मतचोरी'च्या मुद्द्यावरून देशातील विरोधी पक्षांची 'इंडिया' आघाडी आक्रमक झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील १० नेत्यांच्या प्रतिनिधीमंडळाने शुक्रवारी रात्री राष्ट्रपती भवनात जाऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि त्यांना निवेदन सादर केले.

दरम्यान, संसदेपासून राष्ट्रपती भवनाकडे मोर्चा नेणाऱ्या विरोधी पक्षांच्या इतर सर्व खासदार आणि वरिष्ठ नेत्यांना पोलिसांनी विजय चौकात बॅरिकेड्स लावून रोखले. त्यानंतर संतप्त झालेल्या काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी, कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांनी विजय चौकातील रस्त्यावरच ठाण मांडत जोरदार ठिय्या आंदोलन सुरू केले.

शुक्रवारी रात्री सुमारे ८ वाजता 'इंडिया' आघाडीचे शेकडो खासदार हातात 'लोकशाही वाचवा' असे फलक घेऊन संसदेतून राष्ट्रपती भवनाच्या दिशेने शांततापूर्ण मार्गाने निघाले. मात्र, विजय चौकाजवळ दिल्ली पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात करत बॅरिकेड्स लावून त्यांना रोखले. पोलिसांनी रोखताच विरोधी खासदारांनी तेथेच रस्त्यावर बसून केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली.

या ठिय्या आंदोलनात काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वाड्रा, काँग्रेसचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा, गौरव गोगोई यांच्यासह विविध घटक पक्षांचे प्रमुख नेते सहभागी झाले होते.




**नांदेड :** जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास महामंडळ नांदेड संलग्न महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संघटनेच्यावतीने वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी या मागणसाठी वृत्तपत्र विक्रेत्यांनी परिवारासह जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना निवेदन देण्यात आले. (छाया : नरेंद्र गडप्पा)






## भाजप महानगरतर्फे पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने सेवा संकल्प अभियान अंतर्गत शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी दोन विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना नांदेड महानगरातील सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

या अभियानांतर्गत पहिला कार्यक्रम 'विकसित स्वप्नांचा भारत' या विषयावर रंगभरण व चित्रकला स्पर्धेचा असणार आहे. ही स्पर्धा सकाळी ७.३० वाजता यशवंत महाविद्यालय मैदान येथे घेण्यात येणार आहे.

दुसरा कार्यक्रम 'आंगण का सन्मान' अर्थात अंगणवाडी सेविका सन्मान कार्यक्रम असणार आहे. हा कार्यक्रम सकाळी १०.३० वाजता कुसुम सभागृह, व्ही. आय.पी. रोड, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. वरील दोन्ही कार्यक्रमांमध्ये भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेड महानगर अध्यक्ष आ. अमरनाथ राजूरकर यांनी केले आहे.

# शेतात कापूस-तूरीमध्ये गांजा; नांदेड पोलिसांनी उद्धवस्त केला १०.५ किलो गांजाचा मळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** कापूस आणि तुरीच्या पिकात आंतरपीक म्हणून बेकायदेशीरपणे गांजाची शेती करणाऱ्या शेतकऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली आहे. या कारवाईत १० किलो ५०० ग्रॅम वजनाचा एकूण ५ लाख २५ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त करून शेती उद्धवस्त करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीम सुरू आहे. या मोहिमेंतर्गत दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी एलसीबीचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना दिग्रस (बु.) शिवारात गांजाची लागवड झाल्याची खात्रीशीर गुप्त माहिती मिळाली.

माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षकांची परवानगी घेऊन त्यांनी आपले सहकारी सपोनि रवी वाहुळे, राजपत्रित अधिकारी, शासकीय पंच, तोलमापक आणि एलसीबी पथकाने शेतावर छापा टाकला. यावेळी कापूस आणि तुरीच्या पिकामध्ये लपवून जोपासना केलेली गांजाची झाडे आढळली. पंच व राजपत्रित अधिकाऱ्यांसमक्ष १०.५०० किलो गांजा जप्त करण्यात आला.

यांप्रकरणी आरोपी श्रीकृष्ण रामराव गुट्टे (रा. दगडवाडी,



ता. अहमदपूर, जि. लातूर, ह.मु. भेंडेवाडी, ता. कंधार) याच्याविरुद्ध कंधार पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३७९/२०२६ कलम ८(क), २०(ब) एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अतुल भोसले, पो. नि. घोडके, सपोनि रवि वाहुळे, पोउपनि बळीराम दासरे व अंमलदार गुंडेराव करले, दिलीपकुमार चंचलवार, सुनील गट्टलेवार, कवठेकर, देविदास चव्हाण, मोतीराम पवार, सिद्धार्थ सोनसळे, शुभम श्रीभाते यांनी पार पाडली. अंमली पदार्थांची विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# अंतराळात भारताचा शिक्का!

आज शेतकरी हवामानाच्या लहरीपणाशी झुंजत आहे. कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळ, कधी गारपीट, तर कधी अवकाळी पाऊस; बदलत्या हवामानामुळे शेतीचे गणितच विस्कटले आहे. अशा परिस्थितीत उपग्रहाच्या माध्यमातून पिकांची स्थिती, जमिनीतील बदल, पाण्याची उपलब्धता आणि हवामानातील संभाव्य बदल यांचा अभ्यास करता आला, तर त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो. पीकविमा, नुकसानभरपाई, सिंचन नियोजन आणि पिकांच्या अंदाजातही उपग्रहाधारित माहिती अधिक अचूकता आणू शकते. याच दृष्टिकोनातून अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात भारताने पुन्हा एकदा आपली क्षमता सिद्ध केली आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने मागच्या महिन्यात अत्याधुनिक पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण करून देशाच्या अंतराळ सामर्थ्यात आणखी एक महत्त्वाची भर घातली. श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून या प्रक्षेपकाद्वारे झालेल्या या मोहिमेकडे केवळ आणखी एक उपग्रह प्रक्षेपित झाला, अशा मर्यादित दृष्टिकोनातून पाहणे योग्य ठरणार नाही. या मोहिमेमागे भारताच्या सामरिक, कृषी, पर्यावरणीय आणि आपत्ती व्यवस्थापन क्षमतेला नवे बळ देण्याची व्यापक भूमिका आहे. आजच्या जगात माहिती हेच सामर्थ्य आहे. विशेषतः उपग्रहांच्या माध्यमातून मिळणारी अचूक आणि सातत्यपूर्ण माहिती ही राष्ट्रीय सुरक्षेपासून शेतीपर्यंत अनेक क्षेत्रांसाठी निर्णायक ठरते. भारताच्या सीमावर्ती भागांवर तसेच आजूबाजूच्या प्रदेशांतील बदलांवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी पृथ्वी निरीक्षण उपग्रहांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. चीन आणि पाकिस्तानसारख्या देशांच्या हालचालींच्या पार्श्वभूमीवर भारताला वेळेवर आणि अचूक माहिती मिळणे ही राष्ट्रीय सुरक्षेची गरज आहे. त्यामुळे याकडे केवळ वैज्ञानिक उपलब्धी म्हणून नव्हे, तर भारताच्या सामरिक सज्जतेतील महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहिले पाहिजे. मात्र या उपग्रहाचे महत्त्व केवळ सीमांवर लक्ष ठेवण्यापुरते मर्यादित नाही. पृथ्वीचे अत्याधुनिक निरीक्षण करणारे संवेदक आणि कॅमेरे असलेल्या या उपग्रहातून मिळणारी माहिती शेती, जलसंपत्ती, हवामान, वनसंपदा, पर्यावरण, शहरी नियोजन आणि नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणात उपयोगी पडू शकते. विशेषतः कृषीप्रधान भारतासाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रातही या उपग्रहाचे महत्त्व मोठे आहे. पूर, चक्रीवादळ, अतिवृष्टी, भूस्खलन किंवा अन्य नैसर्गिक संकटांच्या वेळी जमिनीवरील यंत्रणेला परिस्थितीचे अचूक आकलन होणे आवश्यक असते. उपग्रहांकडून मिळणाऱ्या प्रतिमा आणि माहितीमुळे संकटग्रस्त भाग निश्चित करणे, बचावकार्याचे नियोजन करणे आणि मदत यंत्रणा योग्य ठिकाणी पोहोचवणे अधिक परिणामकारक होऊ शकते. म्हणजेच अंतराळातील तंत्रज्ञानाचा थेट संबंध सामान्य नागरिकाच्या जीविताशी आणि सुरक्षिततेशी जोडला जातो. इस्रोच्या या यशाचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे अलीकडील काही प्रक्षेपणांतील अपयशानंतर मिळालेले यश. अंतराळ मोहिमांमध्ये अपयश ही विज्ञानाच्या प्रवासातील अपरिहार्य बाब असली तरी त्यातून शिकून पुढील मोहिमेत यश मिळवणे हीच वैज्ञानिक वृत्ती आहे. इस्रोने पुन्हा एकदा आपल्या तांत्रिक कौशल्यावरचा विश्वास सार्थ ठरवला आहे. भारताने आता अंतराळ संशोधनाकडे केवळ प्रतिष्ठेच्या दृष्टीने पाहण्यापेक्षा त्याचा उपयोग नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडण्याची वेळ आली आहे. उपग्रह अंतराळात पोहोचला, याचा आनंद साजरा करणे आवश्यकच; पण त्यातून मिळणारी माहिती शेतकऱ्यापर्यंत, आपत्तीग्रस्त नागरिकापर्यंत आणि प्रशासनाच्या निर्णयप्रक्रियेपर्यंत किती वेगाने पोहोचते, यावर या यशाचे खरे मोल ठरेल.

# एआयच्या युगात कौशल्यांची नवी व्याख्या




कृत्रिम बुद्धिमत्तेने (एआय) आपल्या कामकाजाची पद्धत मोठ्या प्रमाणात बदलली आहे. अनेक क्लिष्ट आणि वेळखाऊ कामे एआयच्या मदतीने काही क्षणांत पूर्ण होऊ लागली आहेत. अशा परिस्थितीत आपली व्यावसायिक मूल्यवत्ता टिकवून ठेवायची असेल, सातत्याने प्रगती करायची असेल आणि काम अधिक परिणामकारकपणे पूर्ण करायचे असेल, तर कौशल्यांमध्ये नियमितपणे सुधारणा करणे ही आता गरज बनली आहे. एकेकाळी नोकरी मिळवण्यासाठी पदवी हीच प्रमुख पात्रता मानली जात होती. त्यानंतर पदवीसोबत संगणकाचे ज्ञान, तांत्रिक कौशल्य आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व यांचे महत्त्व वाढले. आता या यादीत आणखी एका महत्त्वाच्या कौशल्याची भर पडली आहेएआयची कार्यपद्धती समजून घेणे आणि त्याचा प्रभावी वापर करता येणे.

जागतिक आर्थिक मंचाच्या 'फ्युचर ऑफ जॉब्स २०२५' अहवालानुसार, २०३० पर्यंत सुमारे ४० टक्के कार्यकौशल्यांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. एआय आणि बिग डेटाचे ज्ञान भविष्यात अत्यंत महत्त्वाचे ठरणार असले, तरी विश्लेषणात्मक विचार, सर्जनशीलता, बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, नेतृत्वगुण आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती यांचे महत्त्वही कमी होणार नाही. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (खङज) अंदाजानुसार, जगातील जवळपास प्रत्येक चारपैकी एका नोकरीवर जनरेटिव्ह एआयचा काही ना काही परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र, याचा अर्थ मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या नाहीशा होतील, असा नाही. उलट, बहुतांश क्षेत्रांमध्ये नोकऱ्यांचे स्वरूप बदलण्याची आणि काम करण्याच्या पद्धती नव्याने निश्चित होण्याची शक्यता अधिक आहे.

**तंत्रज्ञानासोबत माणसाचे आकलनही महत्त्वाचे**

या बदलातून एक गोष्ट स्पष्ट होतेभविष्यात कंपन्यांना केवळ तंत्रज्ञानाचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तींची गरज असणार नाही. तंत्रज्ञानासोबत माणूस, समाज, संस्कृती, नैतिकता आणि गुंतागुंतीच्या समस्यांचे आकलन असणारे मनुष्यबळ अधिक मौल्यवान ठरणार आहे. त्यामुळे आजच्या तरुणांसाठी केवळ तंत्रज्ञान समजून घेणे पुरेसे राहणार नाही. माणसांना समजून घेणे, त्यांच्या गरजा आणि भावविश्व ओळखणे, परिस्थितीचा संदर्भ समजून घेणे आणि योग्य निर्णय घेणे ही कौशल्येही तितकीच महत्त्वाची ठरणार आहेत.

**योग्य प्रश्न विचारण्यापेक्षा योग्य समस्या ओळखणे महत्त्वाचे**

एआयकडून चांगले उत्तर मिळवण्यासाठी चांगला 'प्रॉम्प्ट' लिहिणे आवश्यक आहे. मात्र, त्यापेक्षाही महत्त्वाचा प्रश्न आहेआपण योग्य प्रश्नच विचारत आहोत का? आज विद्यार्थी किंवा व्यावसायिक एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात बराच वेळ खर्च करतात. भविष्यात मात्र योग्य समस्या ओळखणे, तिची अचूक व्याख्या करणे, तिचा संदर्भ समजून घेणे आणि अपेक्षित परिणाम निश्चित करणे याला अधिक महत्त्व प्राप्त होईल. एआयला काय विचारायचे, यापेक्षा नेमकी कोणती समस्या सोडवायची आहे, हे स्पष्ट असणे अधिक महत्त्वाचे ठरू शकते. समस्या चुकीची ओळखली गेली, तर एआयकडून मिळालेले अत्यंत अचूक उत्तरही प्रत्यक्ष उपयोगाचे ठरणार नाही.

**एआयपासून दूर जाण्याऐवजी त्याचा योग्य वापर शिका**

एआयची भीती बाळगून त्यापासून दूर राहणे ही भविष्यासाठी व्यवहार्य रणनीती नाही. त्याऐवजी आपल्या क्षेत्रात एआयचा प्रभावी आणि जबाबदार वापर कसा करता येईल, हे शिकणे अधिक शहाणपणाचे ठरेल. लेखक संशोधन आणि प्राथमिक मसुद्यासाठी, वकील कागदपत्रांच्या विश्लेषणासाठी, डॉक्टर प्रशासकीय कामांसाठी, शिक्षक अध्यापन साहित्य तयार करण्यासाठी, तर व्यापारी आणि व्यवस्थापक डेटा विश्लेषणासाठी एआयचा वापर करू शकतात. मात्र, अंतिम निर्णय, तथ्यांची पडताळणी, आवश्यक तपासणी आणि त्या निर्णयाची जबाबदारी ही माणसाचीच असली पाहिजे. आज योग्य 'प्रॉम्प्ट' लिहिणे हे निश्चितच उपयुक्त कौशल्य आहे. मात्र, एखाद्या एका एआय साधनावर किंवा विशिष्ट तंत्रज्ञानावर संपूर्ण करिअर अवलंबून ठेवणे धोकादायक ठरू शकते. कारण तंत्रज्ञान बदलण्याचा वेग प्रचंड आहे. आज लोकप्रिय असलेले एखादे साधन उद्या मागे पडू शकते. त्यामुळे अधिक टिकाऊ रणनीती म्हणजे आपल्या मूलभूत व्यावसायिक कौशल्याला एआयच्या ज्ञानाची जोड देणे.

**मूळ कौशल्य + एआय = भविष्यातील ताकद**

पत्रकाराने एआयचा वापर करून माहितीचे विश्लेषण, संशोधन आणि डेटा हाताळणे शिकावे; डॉक्टरांनी प्रशासकीय आणि माहिती व्यवस्थापनातील कामे अधिक कार्यक्षम करण्यासाठी त्याचा वापर समजून घ्यावा; शिक्षकांनी अध्यापन साहित्य आणि शैक्षणिक साधने तयार करण्यासाठी एआयचा उपयोग करावा; डिझायनर, वकील, मार्केटिंग व्यावसायिक आणि इतर क्षेत्रातील तज्ज्ञांनीही आपल्या कामाच्या स्वरूपानुसार एआयशी जुळवून घ्यावे. म्हणजेच भविष्यात यशस्वी होणारा व्यावसायिक हा केवळ 'एआय जाणणारा' नसेल, तर आपल्या मूळ क्षेत्रातील सखोल ज्ञानाला एआयच्या क्षमतेची जोड देणारा व्यावसायिक असेल. ही सांगड कार्यक्षमता, गुणवत्ता आणि स्पर्धात्मक क्षमता निश्चितच वाढवू शकते.

**सर्जनशीलतेची जागा मशीन घेऊ शकत नाही**

एक यंत्र हजारो पर्याय तयार करू शकते; मात्र, त्यापैकी आपल्या परिस्थितीत कोणता पर्याय अर्थपूर्ण, योग्य आणि परिणामकारक आहे, हे ठरवण्यासाठी मानवी समज, अनुभव आणि विवेकाची गरज राहणारच आहे. जागतिक आर्थिक मंचाने सर्जनशील विचारशक्तीचा समावेश भविष्यात मागणी वाढण्याची शक्यता असलेल्या महत्त्वाच्या कौशल्यांमध्ये केला आहे. त्यामुळे लेखन, कथाकथन, डिझाइन, कल्पना मांडणे, समस्या सोडवणे आणि नव्या दृष्टिकोनातून विचार करण्याची क्षमता यांचे महत्त्व कायम राहणार आहे. फरक एवढाच असेल की या कौशल्यांचा वापर अधिक प्रभावी करण्यासाठी एआयची मदत कशी घ्यायची, हेही व्यावसायिकांना शिकावे लागेल.

**विषयांच्या सीमा पुसट होत जाणार**

भविष्यात विविध विषयांमधील पारंपरिक भिंती अधिकाधिक कमकुवत होतील. संगणकशास्त्राच्या विद्यार्थ्याला मानसशास्त्राचे ज्ञान उपयुक्त ठरू शकते, अभियंत्याला समाजशास्त्राची समज आवश्यक ठरू शकते, पत्रकाराला डेटाचे ज्ञान उपयोगी पडू शकते, तर डेटा वैज्ञानिकाला प्रभावी संवादकौशल्याची गरज भासू शकते. एआय तज्ज्ञासाठी तंत्रज्ञानासोबत नैतिकतेची जाणही तितकीच महत्त्वाची ठरू शकते. म्हणूनच भविष्यातील रोजगारविश्वात एका विषयातील सखोल ज्ञान आणि इतर विषयांची पुरेशी समज असलेली व्यक्ती अधिक प्रभावी ठरू शकते.

**एआय सांगेल ते खरेच असेल असे नाही**

एआयचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तो चुकीची माहितीही अत्यंत आत्मविश्वासाने मांडू शकतो. त्यामुळे भविष्यातील सर्वात महत्त्वाच्या कौशल्यांपैकी एक असेलमाहितीची पडताळणी करण्याची क्षमता. एआयने तयार केलेले उत्तर वापरण्यापूर्वी त्याचा स्रोत तपासणे, आकडेवारीची पडताळणी करणे, संदर्भ समजून घेणे आणि स्वतंत्र उपलब्ध माहितीसोबत त्याची तुलना करणे आवश्यक ठरेल. यासाठीच चिकित्सक विचारशक्ती (Critical Thinking) ही केवळ विद्यार्थ्यांसाठी नव्हे, तर प्रत्येक व्यावसायिकासाठी अत्यावश्यक कौशल्य बनत आहे.

**भविष्यात माणूस आणि मशीन यांचा सहकार्याचा काळ**

एआय माणसाची जागा घेईल की नाही, हा प्रश्न विचारण्यापेक्षा एआयच्या मदतीने माणूस अधिक चांगले काम कसे करू शकेल, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. भविष्यात स्पर्धा केवळ माणूस विरुद्ध मशीन अशी नसेल. खरी स्पर्धा असेल ती एआयचा प्रभावी वापर करणारा माणूस आणि एआयचा वापर न करणारा माणूस यांच्यात. म्हणून एआयला प्रतिस्पर्धी मानण्यापेक्षा तो आपल्या कौशल्यांना अधिक धार देणारे साधन म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान बदलत राहील, साधने बदलत राहतील; पण जिज्ञासा, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, समस्या ओळखण्याची क्षमता, मानवी संवेदनशीलता आणि सतत शिकण्याची वृत्ती ही कौशल्ये भविष्यातही आपली खरी ताकद राहतील. एआयचे युग हे माणसाच्या कौशल्यांचा अंत करणारे युग नसून, माणसाच्या कौशल्यांना नव्या पद्धतीने वापरण्याची संधी देणारे युग ठरू शकते.

-मच्छिंद्र ऐनापुरे,
जत जि.सांगली

# उपजीविकेला पर्यटनाची जोड: महाराष्ट्रातील अंतर्देशीय जलपर्यटनाच्या नव्या संधी

विस्तीर्ण धरणे, तलाव आणि १७,००० किलोमीटरहून अधिक लांबीच्या नद्यांच्या जोरावर महाराष्ट्र गोड्या पाण्यातील मत्स्य-जलपर्यटनाचे (इन्लैंड क्वाटुरिझम) नवे केंद्र बनू पाहत आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय नेहमीच अन्न आणि उपजीविकेचा महत्त्वाचा आधार राहिला आहे. मात्र, केवळ पारंपरिक मासेमारीवर अवलंबून न राहता त्याला मनोरंजनात्मक पर्यटनाची जोड दिल्यास शाश्वत ग्रामीण उद्योजकतेचा नवा मार्ग खुला होऊ शकतो. मत्स्यव्यवसाय आणि पर्यटनाचा हा संगम 'मत्स्य आधारित जलपर्यटन' (Fisheries- based quatourism) म्हणून वेगाने पुढे येत आहे. सागरी किनारपट्टीबरोबरच राज्याच्या ग्रामीण व निमशहरी भागात पसरलेली गोड्या पाण्याची नैसर्गिक संसाधने अंतर्देशीय जलपर्यटनासाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण करतात.

केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्राकडे १७,८६१ किलोमीटर लांबीचे नद्या व कालव्यांचे जाळे आहे. याशिवाय ३४८७ लहान जलाशय (१.६८ लाख हेक्टर), ६७ मध्यम व मोठे जलाशय (१.३३ लाख हेक्टर) आणि ५३,०८७ हेक्टर क्षेत्र तलाव व डबक्यांच्या स्वरूपात उपलब्ध आहे. २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीत राज्यातील अंतर्देशीय मत्स्योत्पादनाने १८.०६% चा लक्षणीय सरासरी वार्षिक वृद्धीदर नोंदवला असून, २०२४- २५ मध्ये गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन २.७१ लाख टनांवर पोहोचले आहे. जलसंपदेचा हा प्रचंड विस्तार आता ग्रामीण भागात केवळ अन्ननिर्मितीपुरता मर्यादित न राहता पर्यटनाच्या माध्यमातून अतिरिक्त आर्थिक उत्पन्नाचे साधन बनू शकतो.




**अंतर्देशीय जलपर्यटनाचे विविध आयाम**

महाराष्ट्रातील प्रमुख धरणांच्या आणि नद्यांच्या परिसरात गोड्या पाण्यातील जलपर्यटनाचे अनेक पर्याय विकसित केले जाऊ शकतात.

**जलाशयातील क्रीडा मासेमारी व नौकाविहार:** उजनी, कोयना, जायकवाडी आणि भातसा यांसारख्या मोठ्या जलाशयांमध्ये 'पकडा आणि सोडा' (कॅच अँड रिलीज) या तत्त्वावर नियंत्रित अँगलिंग (गळ मासेमारी) सुरू करता येऊ शकते. राज्यात जलाशयांमध्ये पिंजरा पद्धतीतील मत्स्यपालनाचे (केज कल्चर) ५,४४० पेक्षा जास्त युनिट्स मंजूर करण्यात आले आहेत. या तरंगत्या मत्स्यपिंजऱ्यांलगत पर्यटकांसाठी पर्यावरणपूरक बोटिंग आणि हाऊस Default/फ्लोटिंग कॉटेजचे नियोजन सहज शक्य आहे.

**'स्वतःचा मोती स्वतः तयार करा' कार्यशाळा:** गोड्या पाण्यातील शिंपल्यांपासून मोती तयार करण्याचे तंत्रज्ञान (पर्ल कल्चर) आता कृषी पर्यटनाचा रंजक भाग बनत आहे. शेततळ्यांवर येणाऱ्या पर्यटकांना मोती निर्मितीची प्रक्रिया दाखवणे, शिंपल्यांमध्ये शस्त्रक्रिया करण्याचे थेट प्रात्यक्षिक देणे आणि स्वतः काढलेला मोती दागिन्यांच्या स्वरूपात खरेदी करण्याची संधी देणे, यातून स्थानिक पातळीवर मोठा गृहउद्योग उभा राहू शकतो.

**मत्स्यपालन थीम पार्क आणि प्रक्षेत्र भेटी:** आधुनिक मत्स्यपालनातील पुनर्चक्रित मत्स्यपालन प्रणाली (RS) युनिट्स (महाराष्ट्रात ५०८ युनिट्स मंजूर) आणि आधुनिक हॅचरी केंद्रांना पर्यटनस्थळाचे स्वरूप दिले जाऊ शकते. विद्यार्थी व पर्यटकांसाठी मत्स्य खाद्य देणे, बायोफ्लॉक तंत्रज्ञानाची माहिती घेणे आणि शेतातून थेट ताज्या माशांचा आस्वाद घेणे (फार्म-टू-टेबल) अशा उपक्रमांना शहरांमधून मोठी पसंती मिळू शकते.

**नदीकाठची साहसी पर्यटन केंद्रे:** पश्चिम महाराष्ट्रातील आणि विदर्भातील नद्यांच्या शांत पात्रात रिव्हर राफ्टिंग, कयाकिंग आणि निसर्ग भ्रमंतीचे आयोजन करून नदीकाठच्या मच्छीमार बांधवांना थेट गाइड म्हणून रोजगार मिळवून देणे शक्य आहे.

**स्थानिक महिलांचे सक्षमीकरण आणि उद्योजकता**

अंतर्देशीय जलपर्यटनाचा सर्वात मोठा फायदा स्थानिक समुदायाला, विशेषतः महिलांना होतो. महाराष्ट्रातील अंतर्देशीय मत्स्यव्यवसायात महिलांची संख्या लक्षणीय असून, एकूण ११.३२ लाख अंतर्देशीय मच्छीमार लोकसंख्येपैकी ५.२९ लाख (सुमारे ४६.८%) महिला आहेत. जलपर्यटनाच्या विकासामुळे महिला बचत गटांना प्रक्षेत्रावरच पारंपरिक खाद्यपदार्थ विक्री केंद्रे (कॅन्टीन), स्थानिक माशांचे मूल्यवर्धित पदार्थ आणि ग्रामीण होमस्टे चालवण्याची थेट संधी मिळते. मत्स्य क्षेत्रातील भागधारकांच्या अभ्यासानुसार, तब्बल ८५% तज्ज्ञांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की, जलपर्यटनामुळे ग्रामीण भागात स्वयंरोजगार आणि नव्या उद्योजकतेच्या अभूतपूर्व संधी निर्माण होऊ शकतात.

**धोरणात्मक आव्हाने आणि मार्ग**

सध्याच्या पाहणीनुसार, जलपर्यटनाच्या मार्गात जनजागृती आणि प्रभावी विपणनाचा (मार्केटिंग) अभाव (६२%) तसेच अपुऱ्या पायाभूत सुविधा (४८%) ही प्रमुख आव्हाने आहेत. या क्षेत्राच्या सुनियोजित विकासासाठी ७५% भागधारकांनी सर्वसमावेशक सरकारी धोरणाची आवश्यकता अधोरेखित केली आहे. 'प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना (PMMSY) अंतर्गत जलाशयांच्या ठिकाणी सुरक्षित जेटी, पर्यटकांची बसण्याची सोय, स्वच्छतागृहे आणि लाइफ जॅकेट्ससारख्या सुरक्षितता उपायांची जोड देऊन पर्यटकांचा विश्वास संपादन केला जाऊ शकतो.

जलपर्यटन हा निव्वळ विरंगुळा नसून ग्रामीण आणि शेतकरी कुटुंबांना हंगामी अनिश्चिततेतून बाहेर काढणारा एक शाश्वत आर्थिक आधार आहे. महाराष्ट्रातील अथांग जलाशय आणि समृद्ध नदीप्रणालीचा हा वारसा पर्यटनाशी जोडून राज्य सरकार ग्रामीण भागात समृद्धीची एक नवी 'निळी क्रांती' घडवून आणू शकते.

**-शुभम सोनी व अश्मिता पाण्डेय**

'मत्स्य विज्ञान महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
केंद्रीय मात्स्यिकी शिक्षण संस्था, वर्सोवा, मुंबई

# देवीच्या मारक रूपाची उपासना



नवरात्र हा खरेतर मांगल्याचा आणि पावित्र्याचा उत्सव. स्त्रीशक्तीचा जागर करण्याचा उत्सव, देवीच्या पराक्रमाची उपासना करण्याचा उत्सव. महिषासुराशी नऊ दिवस युद्ध करून नवव्या रात्री देवीने महिषासुराचा वध केला. या युद्धाचे प्रतीक म्हणून टिपऱ्या म्हणजेच दांडिया खेळल्या जातात. आजमितीला मात्र या उत्सवाला आलेले ग्लॅमरस स्वरूप उत्सवाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. चांगले नृत्य करता यावे म्हणून तरुणींसह तरुणही एक महिना अगोदरपासून नृत्याचे क्लासेस घेऊ लागले आहेत. पाठ उघडी ठेऊन त्यावर रंगरंगोटी करण्याचे किळसवाणे फॅड गेल्या काही वर्षांपासून तरुणींमध्ये शिरले आहे. नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे, कपड्यांसह त्यांना मॅचिंग आभूषने परिधान करणे, साजेसा मेकअप करणे, गरबा नृत्य करताना अथवा दांडिया खेळताना इतरांपेक्षा वेगळे दिसण्याचा प्रयत्न करणे याकडेच महिलांचा अधिक कल दिसून येतो. एका राक्षसी प्रवृत्तीवर प्रकट स्त्रीशक्तीने युद्ध करून मिळवलेला विजय म्हणजे नवरात्रीचा उत्सव. या नऊ दिवसांत देवीने युद्ध करून क्षात्रतेजाच्या उपासनेचे महत्व पटवून दिले. स्त्री ही अबला नसून प्रसंगी अन्याय अत्याचाराचा कर्दनकाळ ठरू शकते हे देवीने स्वतः युद्ध करून दाखवून दिले. आज आपण नवरात्रीच्या काळात दांडिया किंवा टिपऱ्या खेळतो, हा खेळ नसून ते युद्धाचे प्रतीकात्मक स्वरूप आहे हेही आज अनेकांना माहित नाही.

आजमितीला स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना कमालीच्या वाढल्या आहेत. ३ वर्षाच्या बालिकेपासून वयोवृद्धाही आज सुरक्षित नाहीत. लव्ह जिहादरूपी राक्षस हिंदू स्त्रियांना विविध आमिषे आणि प्रलोभने दाखवून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून हिंदूंचा वंशविच्छेद करू लागला आहे. राजकीय मंडळींना स्त्रियांच्या सुरक्षेपेक्षा राज्यात आपली सत्ता आणणे अधिक महत्वाचे वाटत असल्याने स्त्री सुरक्षेच्या दृष्टीने ठोस पावले उचललीच जात नाहीत. अशा वेळी स्त्रियांनीच आपल्या सुरक्षेसाठी सज्ज झाले पाहिजे.

समाजाची ढासळलेली नीतिमत्ता पाहता प्रतिकूल प्रसंगांना सामोरे जाण्याची वेळ स्त्रियांवर कधीही येऊ शकते यासाठी प्रत्येक स्त्रीने आपले शरीर आणि मन प्रतिकारक्षम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता स्त्रियांनी स्वरक्षणाचे प्रशिक्षण घेणे आज अत्यंत गरजेचे बनले आहे. कराटे, लाठीकाठी यांसह आपल्या दैनंदिन वापरातील वस्तूंच्या आधारे स्वतःचे रक्षण कसे करावे, प्रवासात स्वरक्षणासाठी कोणती साधने स्वतःसोबत बाळगावीत यांचे विनामूल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि संघटना आज गावोगावी आहेत. त्यांचा लाभ करून स्वतःतील आत्मबल वाढवूया. जेव्हा कधी आपल्यावर प्रतिकूल प्रसंग येईल तेव्हा आपले नातेवाईक, मित्र मंडळी, पोलीस, राजकीय मंडळी आपले रक्षण करण्यास वेळेत पोहोचतील याची शाश्वती नाही अशा वेळी समोरच्याशी दोन हात करून त्याला धडा शिकवायचा असेल तर तेव्हढी शारीरिक आणि मानसिक क्षमता आपल्यामध्ये असणे आज आवश्यक आहे. आपल्यासोबत आपल्या परिसरातील, कार्यालयातील स्त्रियांना सबला बनवण्याचे दायित्व आज स्त्रियांनीच घेण्याची वेळ आली आहे. स्त्रियांना कायद्याचेही संरक्षण असल्याने समाजातील वासनांध प्रवृत्तीचा नायनाट करण्यासाठी स्त्रियांनीच पुढे यायला हवे. आजच्या स्त्रियांसमोर आदर्श हवा आहे तो रणरागिणी झाशीच्या राणीचा, राजमाता जिजाबाईंचा, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचा. राणी चेन्नमांचा. स्त्रीशक्तीचा या प्रकट रूपाची उपासना करण्याची वेळ आता आली आहे. त्यामुळे या नवरात्रीला नवरात्री उत्सवामागील भावार्थ समजून घेऊन दुर्गादेवीच्या मारक रूपाची उपासना करण्याचा संकल्प करा !

**-जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# लोहा शहर बनले आता हायवेचे हब!

- आ. चिखलीकरांच्या पाठपुराव्यामुळे मतदारसंघात चार राष्ट्रीय महामार्ग, मराठवाड्याची कनेक्टीव्हीटी
- लोहा-कंधारमधून एनएच-३६१, ३६१ एफ, एनएच- ५० आणि एनएच-१६१ -चार महामार्ग
- लोह्याहून नांदेड २५ मिनिटांत, पंढरपूर ५ तासांत!

**नांदेड (प्रतिनिध)**-लोहा शहर तीन महामार्गावरील वाढते शहर असून ३६१ एफ लोहा-गंगाखेड-बीड-खरवंडी हा २२० किमीचा हायवे लोहा शहरातून सुरू होतो. तो राष्ट्रीय महामार्ग ३६१ ला मिळतो, म्हणून त्यास सुपर रोड म्हटले जाते. शिवाय नॅशनल हायवे ३६१, ३६१ एफ व लोहा-कंधार-उदगीर-बिदर-विजापूर-चित्रदुर्ग हा ७५१ किमी अंतराचा राष्ट्रीय महामार्ग ५० याच शहरातून जातो. मतदार संघातून आणखी एक १६१ ए जातो. त्यामुळे चार महामार्गाचा मतदार संघ अशी ओळख असलेल्या या भागाची कनेक्टीव्ह वेगाने होण्यासाठी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी त्यांच्या १२ वर्षांच्या आमदार व खासदार कार्यकाळात हे मार्ग मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे या भागाचा कायापालट होताना दिसत आहे.

लोहा शहरातून नॅशनल हायवे ३६ हा तुळजापूर - लातूर - अहमदपूर - नांदेड - लोहा - हदगाव - यवतमाळ - नागपूर ५४८ किमीचा रोड झाला आहे. त्यामुळे वेळेची मोठी बचत झाली. लोह्याहून नांदेडला फक्त २५-३० मिनिटात तर पंढरपूरला पाच तासांच्या आत जाता येते. प्रशस्त रोड झाल्यामुळे वेळेची बचत झाली. २०१४ मध्ये आमदार असताना लोहा शहरात २०१६ मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एनएच ३६१ तुळजापूर-बुटीबोटी नागपूर मार्गाचे भूमिपूजन झाले. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग ५० जो की नांदेड - उस्माननगर - शिराढोण -(लोहा) - कंधार - उदगीर - बिदर - कलबुर्गी - विजापूर - चित्रदुर्ग पर्यंत ७५१ किमीचा राष्ट्रीय महामार्ग झाला.



त्यामुळे उस्माननगरसह अनेक दुर्लक्षित गावांना या महामार्गाचा फायदा झाला. उदगीर-बिदरकडे जाणारी वाहतूक वाढली. आ. प्रतापराव पाटील यांच्या प्रयत्नाने कंधारमधील ५० व १६१(ए) मुळे कनेक्टिव्ह वेगाने वाढली. त्या मार्गाचा मावेजा मिळावा म्हणून पाठपुरावा केला.

नांदेड ते बिदर हा १६१ ए राष्ट्रीय महामार्ग म्हणून ओळखला जातो. नांदेड - उस्माननगर -हाळदा - कौठा - मुखेड - बाऱ्हाळी - औराद - बिदरपर्यंत ५३३ किमी लांबीला रस्ता आहे. म्हणून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी खासदार असताना नांदेड -बिदर व नांदेड -लातूर रेल्वे तसेच पाईप लाईनद्वारा गॅस पुरवठा ही कामे मार्गी लावली. तसेच चारही राष्ट्रीय महामार्ग बारा वर्षाच्या काळात मतदारसंघातून पूर्णत्वास गेले.

लोहा शहरातून ३६१ हा तुळजापूर -नागपूर राष्ट्रीय महामार्ग गेले तर शहराच्या मुख्य चौकातून एनएच ३६१ एफ हा लोहा शहरातून सुरू होतो. लोहा - पालम - गंगाखेड - परळी - बीड - खरवंडीपर्यंत २२० किमी रस्ता असून, हे दोन्ही नॅशनल हायवे लोहा मुख्य जंक्शन आहे कंधार शहरातून एनएच ५० गेला आहे. कलंबर या गावातून हा रस्त्या कंधारकडे गेला. त्या महामार्गाला लोह्यातून रोड जोडला आहे. म्हणजे तीन राष्ट्रीय महामार्गावरील लोहा हे शहर वाढते असून झपाट्याने विकसित होत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या विकासकामाच्या पुर्तीसाठी मदत केली असल्याचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सांगितले.

## डॉ. हंसराज जाधव यांचे व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)**- नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी पैठणच्या प्रतिष्ठान महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक, कथाकार डॉ. हंसराज जाधव यांचे 'महाराष्ट्रातील परिवर्तनाची शाहिरी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

नायगाव तालुक्यातील वजीरगाव हे डॉ. हंसराज जाधव यांचे मूळ गाव. या ग्रामीण भागात नाट्यमंडळ व कलापथक चालवणारे ज्येष्ठ कलावंत शाहीर दामोधरराव वजीरगावकर यांचे डॉ. हंसराज हे सुपुत्र होत. २०१० पासून प्रतिष्ठान महाविद्यालयात ते कार्यरत आहेत. महानुभाव साहित्य, संत साहित्य आणि आधुनिक शाहिरी परंपरा ही त्यांची विशेष अभ्यासक्षेत्रे आहेत. 'महानुभावांची आख्यानकाव्ये', 'आधुनिक शाहिरी' हे त्यांचे अभ्यासपूर्ण ग्रंथ व 'मोहरम' हा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. या ग्रंथांना महाराष्ट्रातील विविध मान्यवर संस्थांनी पुरस्कार देऊन गौरविले आहे. मराठवाडा साहित्य परिषद, छ.संभाजीनगरच्या केन्द्रीय कार्यकारिणीमधे संचालक म्हणून ते कार्यरत आहेत.

## किनवटमध्ये १३० बचत गट महिलांना पशुपालन व चारा व्यवस्थापनाचे प्रशिक्षण



**नांदेड (प्रतिनिधी)**- किनवट पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने प्रगती महिला बचत गट, किनवट येथील महिलांसाठी दि. ५ व ६ ऑक्टोबर रोजी दोन दिवसीय पशुपालन व चारा व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास बचत गटातील तब्बल १३० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

प्रशिक्षणादरम्यान महिलांना शेळीपालनाचे शास्त्रीय व्यवस्थापन, पशुधनाचे आरोग्य, निकृष्ट चारा सकस करण्याच्या विविध पद्धती तसेच दुष्काळी परिस्थितीत चारा व पाण्याचे योग्य नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. निकृष्ट चारा सकस करण्याच्या पद्धतींची प्रत्यक्ष प्रात्यक्षिकेही घेण्यात आली.

यावेळी सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. संजीव पाटील, डॉ. योगेश पाटील, डॉ. उमेश सोनटक्के, डॉ. निरंजन बागल, डॉ. सुनील जाधव, डॉ. राहुल जोंधळे, डॉ. शीतल वानखेडे, डॉ. लक्ष्मीकांत ढगारे यांच्यासह पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी मार्गदर्शन केले.

शेळीपालनाच्या माध्यमातून महिलांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे, पशुधनाची उत्पादकता वाढविणे आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी शास्त्रीय पशुपालन पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे आरोग्य व उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी चाऱ्याची उपलब्धता, योग्य साठवणूक, निकृष्ट चाऱ्याचे सकसीकरण आणि पाण्याचा काटकसरीने वापर यांचे महत्त्व प्रशिक्षणातून स्पष्ट करण्यात आले.

## गुरुवाणी अंतर्मनात प्रकाश निर्माण करते -माँ कनकेश्वरी देवी



**नांदेड (प्रतिनिधी)**- धर्म समजून घेण्यासाठी धर्मग्रंथाची, तर धर्मग्रंथाचा अर्थ समजून घेण्यासाठी गुरूची शरणागती आवश्यक असल्याचे प्रतिपादन माँ कनकेश्वरी देवीजी यांनी गुरु महिमा सत्संगात केले.

बाह्य प्रकाशाचे उदाहरण देताना त्या म्हणाल्या की, सूर्य हा बाह्य प्रकाश देतो; मात्र बाह्य प्रकाश मनुष्याच्या अंतर्मनात प्रकाश निर्माण करू शकत नाही. गुरुवाणी ही अंतर्मनाला प्रकाशित करणारी शक्ती आहे. त्यामुळे गुरुवाणीचा स्वीकार श्रद्धा आणि विश्वासपूर्वक केला पाहिजे.

धर्म समजून घ्यायचा असेल तर धर्मग्रंथाची शरणागती घ्यावी आणि धर्मग्रंथ समजून घ्यायचा असेल तर गुरूची शरणागती आवश्यक आहे. गुरूच्या माध्यमातून धर्मग्रंथाचा अर्थ समजतो आणि त्यातून धर्माचे खरे स्वरूपही उलगडते, असे त्यांनी सांगितले.

शिव आणि शंकर यांच्या स्वरूपाचा आधार धर्मशास्त्रात वेदांमध्ये असल्याचे सांगत त्यांनी गुरूच्या महत्त्वावरही प्रकाश टाकला. गुरू हीच ज्ञानाची दिशा देणारी शक्ती असून, गुरुवाणीच्या माध्यमातून जीवनाला योग्य मार्गदर्शन मिळते, असे त्या म्हणाल्या.

या वेळी 'रक्षा करो गुरुदेव हमारी' अशी भावपूर्ण प्रार्थना करण्यात आली. गुरूच्या महिमेचे वर्णन करताना अध्यात्मिक मार्गावर गुरूचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गुरु महिमा सत्संगातून उपस्थितांना धर्म, गुरू आणि अंतर्मनातील प्रकाश यांचा संबंध समजावून सांगण्यात आला.

यावेळी ओमप्रकाश पोकर्णा, एकनाथ मामडे, भगवानराव येमले, राजू पल्लोड(लातूर), रामनारायण मुंदडा (ताडकळस), कैलास मुंदडा (ताडकळस), ओमप्रकाश हेंडा (छ.संभाजीनगर), दिनेश मुंदडा (हिंगोली), अमित सोमाणी (अंबड), नंदा बाहेती (बीड), चाफळे (महातपुरी), शितल कलंत्री (बीड), सुहासनी नळदकर (गंगाखेड), संजय बरवे (गंगाखेड), पंडितराव इदाते (गंगाखेड) आदींची यावेळी उपस्थिती होती. श्री स्वामी समर्थ मंदिर कलामंदिरतर्फे दररोज भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात येत आहे. यावेळी मंदिराचे उपाध्यक्ष हेमंत गिते, रवि टिकोरे, संजय गिल्डा, वेदांत मुंदडा, अरुण काबरा, पराग पाठक आदींनी परिश्रम घेतले.

## उसाला ३५०० रुपये भाव द्या, अन्यथा आंदोलन; दिलीप पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे तहसीलवर निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)**- मुखेड तालुक्यातील शिवाजी सर्व्हिस स्टेशन शुगर युनिट (बाऱ्हाळी) कारखान्याने उसाला प्रतिटन ३५०० रुपये भाव द्यावा, ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना ना नफा ना तोटा तत्त्वावर प्रत्येकी ५० किलो साखर द्यावी आणि ऊस तोड कामगारांच्या मजुरीत वाढ करावी, अन्यथा ऊस शेतकरी व ऊस तोड कामगारांसह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा माजी जि. प. अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर आणि शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी दिला आहे. या मागणीसाठी शेकडो शेतकऱ्यांसह दि. ९ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयावर निवेदन देण्यात आले.



या निवेदनात म्हटले आहे की, शिवाजी सर्व्हिस स्टेशन शुगर युनिटकडून शेतकऱ्यांच्या उसाला अत्यंत कमी भाव दिला जात आहे. २५ किलोमीटर परिसरातील इतर साखर कारखाने चांगला भाव देत असताना शिवाजी शुगर युनिट एफआरपीचे पालन करत नाही. त्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे.

कारखाना टिकला पाहिजे, पण शेतकऱ्यांवर अन्याय करून नाही. शेतकऱ्यांच्या उसाला एफआरपीप्रमाणे भाव मिळालाच पाहिजे, अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली. चालू गळीत हंगाम २०२६ मध्ये उसाला प्रतिटन ३५०० रुपये भाव, ऊस तोड मजुरांच्या मजुरीत वाढ आणि पुरवठादार शेतकऱ्यांना ५० किलो साखर देण्याची मागणी मान्य न झाल्यास आंदोलन अटळ असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## विद्यापीठस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत वैभव हाटकर यांना सुवर्णपदक

**मुदखेड (प्रतिनिधी)**-नुकत्याच पार पडलेल्या विद्यापीठस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत मुदखेड तालुक्यातील मुगट येथील भूमिपुत्र वैभव माधव हाटकर यांनी सुपर हेविवेट गटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर वैभव हाटकर यांची आगामी राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



वैभव हाटकर यांनी यापूर्वी जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले होते. त्यानंतर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना विभागीय स्पर्धेतही सुवर्णपदक पटकावत आपल्या कामगिरीची चमक दाखवली.

## आंबिया बहार फळपीक विमा योजनेचा शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**- पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना आंबिया बहार सन २०२६-२७ अंतर्गत संत्रा, मोसंबी, आंबा, केळी व पपई या फळपिकांसाठी विविध हवामान धोक्यांपासून विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात आले आहे. अधिसूचित क्षेत्रातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित फळपिकांची लागवड करणारे तसेच कुळाने किंवा भाडेतत्त्वावर शेती करणारे शेतकरी योजनेत सहभागी होण्यास पात्र आहेत. भाडेतत्त्वावर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकरार पिकविमा संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी प्रति शेतकरी किमान २० गुंठे (०.२० हेक्टर) उत्पादनक्षम क्षेत्राची मर्यादा आहे. सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून कमाल ४ हेक्टर क्षेत्रापर्यंत विमा संरक्षण घेता येईल. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षण लागू राहणार आहे. निर्धारित वयापेक्षा कमी वयाच्या फळबागांची विमा संरक्षणासाठी नोंद झाल्याचे पडताळणीत आढळल्यास विमा संरक्षण संपुष्टात येऊ शकते.

## गंगाबाई गाडचेलवार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**- देगलूर तालुक्यातील करडखेड येथील बेलदार समाजाच्या ज्येष्ठ महिला श्रीमती गंगाबाई लिंगुराम गाडचेलवार यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७२ वर्षाच्या होत्या.



कै. गंगाबाई गाडचेलवार यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता करडखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रादेशिक परिवहन सहायक दिलीप गाडचेलवार, शिक्षक रणजित गाडचेलवार यांच्या त्या मातोश्री होत.

## पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल येथे आपत्ती व्यवस्थापनाचे ५०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

### गटशिक्षणाधिकारी अजित तरवटे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




**अर्धापूर (प्रतिनिधी)**- येथील पीएम. श्री जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्याध्यापक डॉ. शेख एम. डब्ल्यू. एच. यांच्या पुढाकाराने सेवा संकल्प अभियानांतर्गत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणास नव्याने रूजू झालेले गटशिक्षणाधिकारी अजित तरवटे यांनी 'पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल'ला भेट दिली. या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विशेषत्वाने आयोजित करण्यात आलेल्या सेवा संकल्प अभियानांतर्गत 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाची' पाहणी केली आणि विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीचा धैर्याने सामना करण्याची क्षमता निर्माण व्हावी या उद्देशाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. गटशिक्षणाधिकारी अजित तरवटे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की, कोणत्याही नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी गोंधळून न जाता, संयमाने आणि योग्य तंत्राचा वापर करून स्वतःचा व इतरांचा बचाव करणे अत्यंत महत्त्वाचे असते. शालेय वयात मिळालेले हे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण तुम्हाला भविष्यात एक सतर्क आणि जबाबदार नागरिक बनण्यास नक्कीच मदत करेल.

या प्रशिक्षण सत्रात तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची तत्काळ काळजी, प्रथमोपचार, आग विझवण्याचे प्राथमिक तंत्र आणि बचाव कार्याची (Rescue Operations) विविध प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. तरवटे यांनी विद्यार्थ्यांचा यातील उत्स्फूर्त सहभाग आणि शिकण्याची वृत्ती पाहून समाधान व्यक्त केले.

## ७९ पदकांच्या वर्षावानंतर राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत नांदेडला सांघिक विजेतेपद



**नांदेड (प्रतिनिधी)**- महाराष्ट्र राज्य वेटरन्स एक्वेटिक असोसिएशनतर्फे आयोजित २७ व्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत नांदेड जिल्ह्याने ७९ पदके मिळवून पहिले सांघिक विजेतेपद प्राप्त केले आहे.

एकलव्य क्रीडा संकुल, जळगाव येथे दि. ३ व ४ ऑक्टोबर रोजी संपन्न झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत जलतरणाच्या विविध स्पर्धा प्रकारांमध्ये अत्यंत चुरशीच्या सामन्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील जलतरणपटूंनी एकूण ७९ सुवर्ण, रौप्य आणि रजत पदके प्राप्त करून जनरल चॅम्पियनशिप खेचून आणली आहे.

ही विजयश्री खेचून आणण्यामध्ये जलतरणपटू अरुण किनगावकर, भास्कर अत्रे, शेखर भावसार, प्रा. ओमप्रकाश गुंजकर, वडदकर, मुगाजी काकडे, पांडुरंग गवते, प्रा. एस. एन. देव, राजेंद्र ताटे, राजेश्वर बोधकुर, प्रमोद कुलथे, बालाजी गाडे, बालाजी वाकोडे, चंद्रकांत लामदाडे, ध्याडे अप्पा, भोसले, भालेकर, माळोदे, यशवंतकर यांनी सिंहाचा वाटा उचलला.

## निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी; भोकर तालुका इंडिया आघाडीचे राष्ट्रपतींकडे निवेदन



**भोकर (प्रतिनिधी)**- काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच खासदार प्रियंका गांधी यांच्याबाबत झालेल्या कथित हल्ला व दुर्व्यवहाराच्या घटनेच्या निषेधार्थ भोकर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने काळा दिवस पाळून निषेध व्यक्त करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर भोकर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गोविंद बाबागौड पाटील कोंडलवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रपती महोदयांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात भारताचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याबाबत तसेच संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

लोकशाही मूल्ये, संविधानिक संस्था आणि जनतेच्या अधिकारांचा सन्मान अबाधित राहणे आवश्यक असून, सदर घटनेमुळे लोकशाही मूल्ये व संविधानाच्या तत्त्वांबाबत गंभीर चिंता निर्माण झाली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

तसेच चौकशीत दोष अथवा कायद्याचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. प्रत्यक्ष दोषी आढळणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कायद्यानुसार गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांचे संरक्षण तसेच जनतेचा संविधानिक संस्थांवरील विश्वास अबाधित ठेवण्यासाठी या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी विनंती राष्ट्रपतींकडे करण्यात आली.

यावेळी गोविंद बाबागौड पाटील कोंडलवार, तौसिफ इनामदार,निळकंठ वर्षेवार, एल ए हिरे, आदिनाथ चिंताकुटे, प्रमोद देशमुख कामणगावकर,श्रीमती विजयालक्ष्मी वंकटरेड्डी कारेमगार, श्रीमती सुलोचनाताई ढोले, श्रीमती सुरेखा राजेंद्र माळे, शमीम बेगम, माधव मेकेवाड, दिलीप तिवारी, माधव पवार, आनंदराव अनंतवाड, शिवाजी गायकवाड, दिलीप पोत्रे, सम्राट हिरे,

## जिल्ह्यात शस्त्र व जमावबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)**-जिल्ह्यात आगामी काळात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम, यात्रा, मिरवणुका तसेच संभाव्य आंदोलने होणार आहेत. नवरात्रोत्सव, माहूर येथील रेणुकामाता यात्रा, दसरा, विजयादशमी, धम्मचक्र प्रवर्तन दिन, शीख समाजाचे विविध कार्यक्रम तसेच अन्य सामाजिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७ (१) (३) अन्वये नांदेड जिल्ह्यात दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.

या आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास शस्त्रे, काठ्या, लाठ्या, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, सुरे किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशा वस्तू बाळगण्यास मनाई आहे. तसेच दाहक अथवा स्फोटक पदार्थ, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे, जाहीर घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्ये वाजविणे तसेच सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला बाधा पोहोचेल अशा प्रकारचे भाषण, हावभाव, फलक किंवा चित्रांचे प्रदर्शन करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र जमण्यासही मनाई करण्यात आली आहे.

## विभागीय तायक्वांदो स्पर्धेत प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे यश



**नांदेड (प्रतिनिधी)**- क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा परिषद तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड आणि जिल्हा तायक्वांदो संघटना, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागस्तरीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धा दि. ४ ऑक्टोबर रोजी नांदेड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बॅडमिंटन हॉल येथे पार पडली. यात प्रतिभा निकेतन महाविद्यालयातील खेळाडू संगेश जाधव (अंडर-१९, ४८ ते ५१ किलो वजन गट) प्रथम क्रमांक आणि साईनाथ बेरजे (अंडर-१९, ४१ ते ४५ किलो वजन गट) प्रथम क्रमांक. या दोन्हीही खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय तायक्वांदो क्रीडा स्पर्धेसाठी आपली पात्रता निश्चित केली आहे.

खेळाडूंच्या या शानदार यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर तसेच उपप्राचार्य डॉ. स्वामी, क्रीडा शिक्षिका सविता पतंगे, डॉ. डी. एस. वाघमारे यांच्या हस्ते दोन्ही यशस्वी खेळाडूंचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याप्रसंगी यशवंतकर, डॉ. राऊत, डॉ. गोस्वामी मॅडम, गायकवाड तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नांदेड टेक्सटाईल मिलचे पुनरुज्जीवन करा; रिपाइंची राष्ट्रपती, पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**- उस्मानशाही नांदेड टेक्सटाईल मिल पुन्हा सुरू करावी या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) जिल्हा शाखा नांदेडच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले.

या निवेदनान्वये उस्मानशाही नांदेड टेक्सटाईल मिलचे पुनरुज्जीवन करून ती पुन्हा सुरू करावी. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवावे आणि मुख्य निवडणूक आयुक्तांची थेट नियुक्ती न करता लोकप्रतिनिधींमार्फत निवडणूक घेऊन नियुक्ती करावी. नांदेड टेक्सटाईल परिसरातील मिल कामगारांना प्रधानमंत्री आवास योजना लागू करून टप्प्याटप्प्याने पक्की घरकुले बांधून द्यावीत. राज्य शासनाने सरसकट दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान द्यावे. अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण न करता आरक्षण मर्यादा १३ टक्क्यांवरून २० टक्के करावी. शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण आणि अण्णाभाऊ साठे पुरस्कारप्राप्त मान्यवरांना दरमहा १० हजार रुपये मानधन द्यावे. वसरणी येथील साईकृपानगर गट क्र. २९/१ मधील अनधिकृत अतिक्रमणे हटवून सार्वजनिक रस्ते व राखीव जागेची हद्द निश्चित करावी आणि अतिक्रमित जागा महापालिकेने ताब्यात घ्यावी अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# पालकांची नवी चिंता : मुलगा एआयमध्ये तर मित्र शोधत नाही ना?

## किशोरवयीन मुलांचा 'एआय कंपॅनियन'कडे वाढता कल; भावनिक संवाद धोकादायक ठरण्याची शक्यता, पालकांसमोर नवे आव्हान

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वाढत्या वापरामुळे पालकांच्या चिंतेत आता एका नव्या मुद्द्याची भर पडली आहे. मुलगा इंटरनेटवर काय पाहतो, सोशल मीडियावर कोणाशी बोलतो आणि मोबाइलवर किती वेळ घालवतो, याबरोबरच तो एआयशी काय बोलतो आणि एआय त्याला काय उत्तर देतो, हा प्रश्नही महत्त्वाचा ठरू लागला आहे. भारतात स्मार्टफोन आणि इंटरनेट तुलनेने स्वस्त आणि सहज उपलब्ध असल्यामुळे त्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. आता याच मोबाइलमध्ये एआयची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे मुलांना एआयपासून पूर्णपणे दूर ठेवणे व्यवहार्य नसले, तरी त्याचा सुरक्षित आणि जबाबदार वापर शिकवणे ही पालक, शाळा आणि तंत्रज्ञान कंपन्यांची मोठी जबाबदारी बनली आहे.**



### शाळांमध्ये 'एआय साक्षरता' गरजेची

शाळांमधील एआय साक्षरतेचा अर्थ केवळ चांगले 'प्रॉम्प्ट' कसे लिहायचे, एवढाच मर्यादित नसावा. एआय उत्तर कसे तयार करतो, त्याच्याकडून चुका का होऊ शकतात, त्याला वैयक्तिक माहिती का देऊ नये आणि भावनिक किंवा गंभीर समस्यांमध्ये एआयऐवजी विश्वासू व्यक्तीशी संवाद का साधावा, हेही मुलांना शिकवणे गरजेचे आहे. एआयला आता पुन्हा बाटलीत बंद करणे शक्य नाही. त्यामुळे तंत्रज्ञान कंपन्यांनी सुरक्षिततेची मजबूत व्यवस्था उभी करणे, सरकारांनी योग्य नियम तयार करणे आणि पालक व शाळांनी मुलांना एआयचे स्वरूप समजावून सांगणे आवश्यक आहे. एआय हा उपयुक्त मदतनीस असू शकतो; मात्र प्रत्येक उत्तरावर डोळे झाकून विश्वास ठेवण्यासारखा मित्र नाही, हा संदेश मुलांपर्यंत पोहोचवणे हीच आजच्या काळातील सर्वात महत्त्वाची डिजिटल शिकवण ठरू शकते.

### भारतासमोर प्रमुख आव्हाने



भारतात मुलांच्या ऑनलाइन सुरक्षिततेची जबाबदारी कायदे, तंत्रज्ञान कंपन्यांची धोरणे, शाळा आणि पालकांची डिजिटल समज अशा विविध पातळ्यांवर विभागली गेली आहे. त्यामुळे केवळ 'पॅरेंटल कंट्रोल'चे बटण हा या समस्येवरील पूर्ण उपाय ठरू शकत नाही. मुलांना एआय वापरण्यापासून पूर्णपणे रोखण्यापेक्षा त्यांना एआयची भूमिका समजावून सांगणे अधिक महत्त्वाचे आहे. एआय अभ्यास, माहिती मिळवणे आणि विविध कामांमध्ये मदत करू शकतो; मात्र तो मित्र, डॉक्टर, समुपदेशक किंवा कुटुंबातील व्यक्तीची जागा घेऊ शकत नाही, हे मुलांना समजणे आवश्यक आहे. एआयने दिलेले उत्तर अत्यंत विश्वासार्ह आणि आत्मविश्वासपूर्ण भाषेत लिहिलेले असले, तरी ते चुकीचे असू शकते, याची जाणीवही मुलांना करून देणे गरजेचे आहे.

### मुलांचा एआय 'सोबत्या'कडे वाढता कल

कॉमन सेन्स मीडियाने १३ ते १७ वर्षे वयोगटातील अमेरिकी किशोरवयीन मुलांवर केलेल्या सर्वेक्षणानुसार, ७२ टक्के किशोरांनी किमान एकदा 'एआय कंपॅनियन' अर्थात माणसासारखा संवाद करणाऱ्या एआय चॅटबॉटचा वापर केल्याचे सांगितले. त्यापैकी ५२ टक्के किशोर त्याचा नियमित वापर करतात. सुमारे एकतृतीयांश किशोरांनी सामाजिक संवाद, मैत्री, भावनिक आधार किंवा प्रेमसंबंधांशी संबंधित संवादासाठी एआयचा वापर केल्याचे या सर्वेक्षणात आढळले. याच ठिकाणी एआयची सोय एका नव्या चिंतेत बदलू शकते. कारण एआय कधीही थकत नाही. रात्री उशिरा प्रश्न विचारला तरी तो उत्तर देतो. एकच प्रश्न अनेक वेळा विचारला तरी प्रत्येक वेळी संयमाने उत्तर देतो. किशोरवयीन मुलांसाठी ही सुविधा आकर्षक ठरू शकते.

### भावनिक संवाद वाढला तर धोका अधिक

समजा, एखादा १५ वर्षांचा मुलगा शाळेत मित्राशी भांडण झाल्यानंतर घरी आला. कुटुंबीयांशी बोलण्याऐवजी त्याने आपली समस्या एआयला सांगितली आणि एआयने त्याचे म्हणणे ऐकून त्याला धीर दिला. सुरुवातीला यात विशेष गैर वाटणार नाही. मात्र, प्रत्येक भावनिक समस्या, कौटुंबिक अडचण किंवा महत्त्वाचा निर्णय घेण्यासाठी मुलगा एआयकडेच वळू लागला, तर ही परिस्थिती चिंताजनक ठरू शकते. कारण अशा वेळी मुलाचा प्रत्यक्ष माणसांशी संवाद कमी होऊन एआयवर भावनिक अवलंबित्व निर्माण होण्याची शक्यता असते.

### मुलांच्या सुरक्षेसाठी कंपन्यांचे प्रयत्न

विविध तंत्रज्ञान कंपन्यांनी किशोरवयीन वापरकर्त्यांसाठी सुरक्षा उपाय सुरू केले आहेत. संवेदनशील विषयांवरील संभाषण, स्वतःला इजा करून घेणे, हिंसा, धोकादायक कृती तसेच लैंगिक किंवा आक्षेपार्ह सामग्री याबाबत अधिक कडक सुरक्षा व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पालकांना मुलांच्या खात्यावर काही नियंत्रण ठेवणे, वापराची वेळ निश्चित करणे आणि सुरक्षेशी संबंधित सूचना मिळवणे अशा सुविधाही उपलब्ध करून दिल्या जात आहेत. मात्र, केवळ नवीन सुरक्षा सुविधा निर्माण करणे पुरेसे नाही. त्या सुविधांचा प्रत्यक्ष परिणाम किती प्रभावी आहे, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.

### किशोरवयीन मुलांसाठी सुरक्षा व्यवस्था राबवताना अडचणी

वयाची खात्री करणे हे पहिले आव्हान आहे. इंटरनेटवर एखाद्या वापरकर्त्याचे खरे वय निश्चित करणे सोपे नाही. किशोरवयीन मुलगा स्वतःचे वय चुकीचे सांगू शकतो. वयाचा अंदाज लावणारी स्वयंचलित प्रणालीही प्रत्येक वेळी अचूक ठरेलच असे नाही. दुसरे आव्हान म्हणजे संभाषणाचा संदर्भ समजून घेणे. एखादे मूल आपली गंभीर समस्या थेट शब्दांत सांगेलच असे नाही. ते विनोद, काल्पनिक कथा, संकेत किंवा अप्रत्यक्ष पद्धतीने आपली भावना व्यक्त करू शकते. अशा संभाषणामागे गंभीर धोका आहे की हा केवळ सामान्य संवाद आहे, हे एआयला ओळखणे आव्हानात्मक ठरते. तिसरे आणि महत्त्वाचे आव्हान पारदर्शकतेचे आहे. एखाद्या कंपनीने स्वतःच्या एआय प्रणालीची सुरक्षा तपासून ती सुरक्षित असल्याचा दावा केला, तरी त्यावर पूर्णपणे अवलंबून राहणे योग्य ठरणार नाही. मुलांसाठी तयार करण्यात आलेल्या एआय प्रणालींची स्वतंत्रपणे तपासणी होणे, बाह्य संशोधकांना सुरक्षा यंत्रणेचा अभ्यास करण्याची संधी मिळणे आणि सुरक्षा-संबंधित घटनांची माहिती सार्वजनिक करणे आवश्यक आहे.

### एआयला पूर्णपणे दूर ठेवणे शक्य नाही

एआयचा वापर आता पूर्णपणे थांबवणे किंवा मुलांना त्यापासून कायम दूर ठेवणे व्यवहार्य नाही. मुले अभ्यास, माहिती मिळवणे, कुतूहल शमवणे आणि कदाचित अशा काही गोष्टींसाठीही एआयचा वापर करतील, ज्या एखाद्या व्यक्तीसमोर बोलताना त्यांना संकोच वाटू शकतो. त्यामुळे प्रश्न मुलांना एआय वापरू द्यायचा की नाही, एवढाच राहिलेला नाही. मुलांना एआयचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर कसा शिकवायचा, हा खरा प्रश्न आहे.

# स्विच बंद केल्यानंतरही बल्ब मंद का चमकतो?



## 'घोस्ट ग्लोइंग' म्हणजे काय? वीजबिलावर होतो का परिणाम; ही समस्या कशी दूर कराल?

**तुमच्या घरातील स्विच बंद केल्यानंतरही एलईडी बल्ब मंद प्रकाश देत राहतो का? विशेषतः खोलीत अंधार असताना हा प्रकाश अधिक स्पष्टपणे जाणवतो. स्विच बंद असताना बल्बपर्यंत वीज पोहोचत नसताना तो का चमकतो, असा प्रश्न साहजिकच पडतो. यामुळे वीजबिल वाढते का, याचीही अनेकांना चिंता असते. स्विच बंद केल्यानंतरही एलईडी बल्ब मंदपणे चमकत राहण्याच्या या प्रकाराला तांत्रिक भाषेत 'घोस्ट ग्लोइंग' असे म्हणतात. योग्य उपाय करून ही समस्या दूर करता येते.**

### स्विच बंद असतानाही बल्ब का चमकतो?

घरातील विद्युत वायरिंगमध्ये फेज आणि न्यूट्रल या दोन्ही तारा बराच काळ एकमेकांच्या जवळून जात असतील, तर त्यांच्यामध्ये विद्युत प्रेरणेमुळे (इंडक्शन) अत्यल्प विद्युतप्रवाह निर्माण होऊ शकतो. हा अत्यंत कमी प्रवाह एलईडी बल्बपर्यंत पोहोचल्यास तो मंदपणे चमकू शकतो. पूर्वी वापरले जाणारे १०० वॅटचे पारंपरिक फिलामेंट बल्ब अशा अत्यल्प विद्युतप्रवाहामुळे सहसा चमकत नसत. मात्र, एलईडी बल्ब अत्यंत संवेदनशील असल्यामुळे अगदी कमी प्रमाणातील विद्युतप्रवाहामुळेही त्यामध्ये मंद प्रकाश दिसू शकतो. याशिवाय, घरातील स्विचबोर्डमध्ये फेजऐवजी चुकून न्यूट्रल वायरवर स्विच बसवला असेल, तरीही अशी समस्या उद्‌भवू शकते. अशा परिस्थितीत स्विच बंद केल्यानंतरही बल्बच्या होल्डरपर्यंत फेजचा विद्युतप्रवाह पोहोचत राहू शकतो. त्यामुळे बल्ब मंदपणे चमकत राहतो.

### यामुळे वीजबिल वाढते का?

बल्ब मंदपणे चमकत असल्यामुळे वीजेचा अत्यल्प वापर होतो. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या काही प्रमाणात वीज खर्च होऊ शकतो; मात्र हा वापर इतका कमी असतो की सामान्यतः त्याचा वीजबिलावर जाणवण्याइतका परिणाम होत नाही. म्हणून केवळ बल्ब मंदपणे चमकत असल्यामुळे वीजबिल मोठ्या प्रमाणात वाढेल, अशी चिंता करण्याचे कारण नाही. ही समस्या किरकोळ वाटत असली तरी तिच्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. विशेषतः स्विच न्यूट्रल वायरवर बसवला असल्यास स्विच बंद केल्यानंतरही बल्बच्या होल्डरमध्ये फेजचा विद्युतप्रवाह कायम राहू शकतो. अशा वेळी बल्ब किंवा होल्डरला हात लावल्यास विजेचा धक्का बसण्याचा धोका असतो. त्यामुळे घरातील स्विचबोर्डची वायरिंग प्रशिक्षित किंवा व्यावसायिक इलेक्ट्रीशियनकडून तपासून घेणे योग्य ठरेल. स्विच नेहमी न्यूट्रलऐवजी योग्य फेज वायरवर बसवलेला असावा. फेज वायरवरील विद्युतप्रवाह स्विचद्वारे योग्य पद्धतीने खंडित झाल्यास स्विच बंद केल्यानंतर बल्बमध्ये विद्युतप्रवाह जाणार नाही आणि त्याची मंद चमकही थांबेल. घरातील विद्युत वायरिंग स्वतः उघडून दुरुस्त करण्याचा प्रयत्न करू नका. विद्युत सुरक्षेसाठी हे काम प्रशिक्षित इलेक्ट्रीशियनकडूनच करून घ्यावे.

## स्मार्टफोनचा बॉक्स जपून ठेवावा का?

**नवा स्मार्टफोन खरेदी केल्यानंतर अनेक जण त्याचा बॉक्स उघडताच बाजूला ठेवतात आणि काही दिवसांनी तो कचऱ्यात टाकून देतात. मात्र, स्मार्टफोनचा बॉक्स केवळ पॅकिंगसाठी नसतो. त्यावर असलेली महत्त्वाची माहिती भविष्यात अनेक प्रसंगी उपयोगी पडू शकते. त्यामुळे शक्य असल्यास फोनचा बॉक्स जपून ठेवणे अधिक योग्य ठरते.**

» फोनची ओळख पटवण्यासाठी महत्त्वाचा : स्मार्टफोनच्या बॉक्सवर साधारणपणे IMEI क्रमांक, सीरियल नंबर, मॉडेल आणि व्हेरिएंट यांसारखी माहिती दिलेली असते. फोन हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास ही माहिती महत्त्वाची ठरते. पोलिसांत तक्रार करण्यापासून ते फोन ब्लॉक करण्यासाठी आवश्यक प्रक्रियेतही त्याचा उपयोग होऊ शकतो. फोनमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यासही ही माहिती आवश्यक ठरू शकते.



» वॉरंटी आणि रिटर्नसाठी उपयोग : नवीन फोनमध्ये सुरुवातीच्या काळात काही दोष आढळल्यास तो कंपनीकडे किंवा ऑनलाइन विक्रेत्याकडे बदलून घेण्यासाठी बॉक्सची आवश्यकता भासू शकते. काही कंपन्या वॉरंटी सेवा देताना बिलासोबत बॉक्स किंवा त्यावरील माहिती मागू शकतात. त्यामुळे किमान रिटर्न कालावधी आणि वॉरंटी संपेपर्यंत बॉक्स सुरक्षित ठेवणे चांगले.

» फोन विकताना मिळू शकतो फायदा : भविष्यात फोन विकण्याचा किंवा एक्सचेंज करण्याचा विचार असल्यास मूळ बॉक्स जवळ असणे फायदेशीर ठरते. बॉक्स, बिल आणि फोन व्यवस्थित असल्याने खरेदीदाराचा विश्वास वाढतो. त्यामुळे फोनची विक्री तुलनेने सोपी होण्याबरोबरच चांगली किंमत मिळण्याची शक्यता असते.

» साठवणूक आणि स्थलांतरासाठीही उपयोगी : फोन काही काळ वापरायचा नसल्यास किंवा दुसऱ्या ठिकाणी पाठवायचा असल्यास मूळ बॉक्समध्ये तो अधिक सुरक्षितपणे ठेवता येतो. बॉक्समधील मूळ संरक्षक साहित्य फोनला धक्क्यांपासूनही काही प्रमाणात संरक्षण देते.

» बॉक्स ठेवायचा नसेल तर काय करावे? : बॉक्स जपून ठेवणे शक्य नसेल, तर त्यावरील IMEI क्रमांक, सीरियल नंबर आणि मॉडेलची माहिती छायाचित्र काढून सुरक्षित ठिकाणी जतन करावी. बिलही सुरक्षित ठेवावे. किमान रिटर्न कालावधी संपेपर्यंत बॉक्स न टाकणे अधिक योग्य.

» बॉक्स फेकताना घ्या काळजी : बॉक्स टाकण्यापूर्वी त्यावरील IMEI, सीरियल नंबर किंवा इतर ओळख पटवणारी माहिती असलेला भाग फाडून किंवा नष्ट करून टाकावा. ही माहिती उघडपणे कचऱ्यात गेल्यास तिचा गैरवापर होण्याची शक्यता असते. त्यामुळे बॉक्सपेक्षा त्यावरील वैयक्तिक आणि डिव्हाइसशी संबंधित माहिती सुरक्षित ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे.

# आधारमध्ये नवे सुरक्षा वैशिष्ट्य

### एका क्लिकवर आधार करा लॉक

**आधारच्या माध्यमातून होणाऱ्या डिजिटल फसवणुकीला आळा घालण्यासाठी आधार ॲपमध्ये नवे सुरक्षा वैशिष्ट्य आणण्यात आले आहे. 'आधार लॉक' या सुविधेच्या मदतीने वापरकर्ते आपला १२ अंकी आधार क्रमांक लॉक करू शकतात. आधार लॉक केल्यानंतर तो अनलॉक करेपर्यंत त्याचा वापर करून ओटीपी, ई-केवायसी किंवा बायोमेट्रिक प्रमाणीकरण करता येणार नाही. ही सुविधा विशेषतः ज्या व्यक्तींना वारंवार आधारचा वापर करण्याची आवश्यकता नसते, तसेच आधारशी संबंधित डिजिटल फसवणुकीची चिंता असते, त्यांच्यासाठी उपयुक्त ठरू शकते. ज्येष्ठ नागरिकांचा आधारही लॉक करून त्याच्या गैरवापराचा धोका कमी करता येऊ शकतो.**




» 'आधार लॉक' म्हणजे काय? : 'आधार लॉक' हे आधार क्रमांकाच्या सुरक्षिततेसाठी देण्यात आलेले महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. याच्या मदतीने वापरकर्ता आपला १२ अंकी आधार क्रमांक तात्पुरता निष्क्रिय करू शकतो. आधार लॉक केल्यानंतर तो पुन्हा अनलॉक करेपर्यंत ई-केवायसी, बायोमेट्रिक प्रमाणीकरण आणि ओटीपीच्या माध्यमातून होणारे आधार प्रमाणीकरण करता येणार नाही. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला आपल्या आधार क्रमांकाचा गैरवापर होण्याची भीती असल्यास तो लॉक करून ठेवणे हा अतिरिक्त सुरक्षेचा उपाय ठरू शकतो.

» बायोमेट्रिक लॉकपेक्षा कसे वेगळे? : नव्या आधार ॲपमध्ये यापूर्वीपासून बायोमेट्रिक लॉकची सुविधा उपलब्ध होती. त्याद्वारे आधारशी संबंधित बोटांचे ठसे आणि डोळ्यांच्या बुबुळांची माहिती (आयरिस) लॉक करता येत होती. बायोमेट्रिक लॉक केल्यामुळे या माहितीचा वापर करून प्रमाणीकरण करणे शक्य होत नाही. मात्र, आधारशी संबंधित ओटीपीच्या माध्यमातून किंवा अन्य पद्धतीने आधारचा वापर करण्याची शक्यता कायम राहू शकत होती. आता 'आधार लॉक' सुविधा वापरल्यास बायोमेट्रिक प्रमाणीकरणासोबतच लोकसंख्याशास्त्रीय (डेमोग्राफिक) माहिती आणि ओटीपीद्वारे होणारे प्रमाणीकरणही बंद करता येते. आधार लॉक असताना एखाद्या प्रणालीमध्ये आधार क्रमांकाचा वापर करण्याचा प्रयत्न केल्यास तो क्रमांक लॉक किंवा अवैध असल्याचा संदेश दिसू शकतो. मात्र, आधार लॉक केल्यानंतर आवश्यक



सेवांसाठी १६ अंकी व्हर्च्युअल आयडी (VID) वापरता येते.

» व्हर्च्युअल आयडी का आवश्यक? : आधार लॉक करण्यापूर्वी आपल्या आधार क्रमांकाशी संबंधित १६ अंकी व्हर्च्युअल आयडी तयार करणे आवश्यक आहे. आधार लॉक केल्यानंतर आवश्यक सेवा वापरताना ही व्हर्च्युअल आयडी वापरता येते. व्हर्च्युअल आयडी तयार केली नसेल, तर यूआयडीएआयच्या संकेतस्थळावरून किंवा mAadhaar ॲपच्या माध्यमातून ती तयार करता येते. आधार क्रमांकाच्या तुलनेत व्हर्च्युअल आयडी अधिक गोपनीय पद्धतीने वापरता येते. त्यामुळे आवश्यकतेनुसार व्हर्च्युअल आयडीचा वापर करणे हा आधार क्रमांक थेट शेअर करण्यापेक्षा अधिक सुरक्षित पर्याय ठरू शकतो.

» आधार क्रमांक कसा लॉक कराल? : आपल्या मोबाइलमध्ये आधार ॲप उघडून लॉग-इन करा. ॲपमध्ये दिसणाऱ्या 'Security' या पर्यायावर क्लिक करा. त्यानंतर 'Virtual ID and Aadhaar Lock' हा पर्याय निवडा. आता 'Aadhaar Lock' या पर्यायावर क्लिक करा. व्हर्च्युअल आयडी तयार केलेली नसेल, तर येथे 'Generate VID' हा पर्याय दिसेल. आधी व्हर्च्युअल आयडी तयार करा. त्यानंतर दिलेल्या अटी व शर्ती मान्य करण्यासाठी संबंधित चौकटीवर क्लिक करा. 'Enter VID and Lock Aadhaar' या पर्यायावर क्लिक करा. आपली १६ अंकी व्हर्च्युअल आयडी टाका आणि चेहरा स्कॅन करून पडताळणी पूर्ण करा. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर तुमचा आधार क्रमांक लॉक होईल. आधारचा वारंवार वापर करण्याची गरज नसलेल्या व्यक्तींनी सुरक्षेच्या दृष्टीने ही सुविधा वापरण्याचा विचार करू शकतो. मात्र, आधार लॉक करण्यापूर्वी आवश्यक सेवांसाठी व्हर्च्युअल आयडी उपलब्ध आहे याची खात्री करणे महत्त्वाचे आहे.

# मराठवाड्यात केंद्रीय पत्रकाचे आगमन; विभागीय आयुक्तांकडून दुष्काळी परिस्थितीचे सादरीकरण




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्र शासनाच्या आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथकाला विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज विभागीय आयुक्तालयात विभागातील दुष्काळी परिस्थितीबाबत सविस्तर सादरीकरण केले. यावेळी पर्जन्यमान, पीक परिस्थिती, पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती याबाबत पथकाला माहिति देण्यात आली.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकात एमएनसीएफसीचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार (ग्रेड-खख) डॉ. जसपाल सिंग आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया, कृषी मंत्रालय अंतर्गत काम करणाऱ्या पीक अंदाज केंद्राचे (एमएनसीएफसी) उपसंचालक डॉ. सुनील कुमार दुबे, राज्याचे कृषी विभागाचे सचिव श्री.परिमलसिंग यांचा समावेश आहे.

विभागातील दुष्काळी परिस्थिती, कमी पर्जन्यमानामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई, खरीप पिकांवरील परिणाम तसेच दुष्काळाच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजनांबाबत विभागीय आयुक्तांनी पथकाला माहिती दिली. केंद्रीय पथकाने विभागातील विविध जिल्ह्यांतील परिस्थितीची माहिती जाणून घेत प्रत्यक्ष पाहणीचे उद्या व परवा नियोजन केले.

केंद्रीय पथकाकडून दि. ९ व १० ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार आहे. यावेळी शेतकरी, स्थानिक अधिकारी आणि संबंधित विभागांकडून पीक नुकसान, पाणीटंचाई व दुष्काळी परिस्थितीबाबत माहिती घेतली जाणार आहे. आज आढावा बैठकीला विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या समवेत जिल्हाधिकारी जी. सी. गौडा यांची व अन्य अधिकाऱ्यांची यावेळी उपस्थिति होती.याशिवाय आठही जिल्ह्याचे जिल्हाधिकारी या आढावा बैठकीला दूरदृष्य प्रणालीव्दारे उपस्थित होते.

# भारतीय वंशाच्या नावनेथम नावी पिल्लई यांना नोबेल शांतता पुरस्कार



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – नोबेल शांताता २०२६ पुरस्कार कोणाला मिळणार? याची उत्सुकता गेल्या काही दिवसांपासून होती. कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प या पुरस्कारासाठी आग्रही होते. त्यामुळे या पुरस्काराच्या नावाची चर्चा रंगली होती. अखेर या नावाची घोषणा झाली आहे.

भारतीय वंशाच्या नवनेथम नावी पिल्लई यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. २८७ उमेदवार आणि संघटनांच्या शर्यतीत त्यांच्या नावाची निवड झाली. स्पर्धकांची संख्या पाहता ही शर्यत काही सोपी नव्हती. त्यामुळे त्यांची निवड होण्याचं कारणंही तसंच असणार हे नक्की.. नावी पिल्लई या दक्षिण अफ्रिकेतील प्रख्यात कायदेतज्ज्ञ आहेत. वर्णभेदाच्या काळात कार्यकर्त्यांसाठी खटले लढण्यापासून ते आंतरराष्ट्रीय न्यायालयांमध्ये न्यायाधीश बनण्यापर्यंत आणि संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार प्रमुख होण्यापर्यंत त्यांनी कार्य केले आहे. आता त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली असून नोबेल शांतता पुरस्कारासाठी त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. १९६७ मध्ये पिल्लई या नेटालमध्ये वकिली सुरू करणाऱ्या पहिल्या कृष्णवर्णीय महिला ठरल्या. त्या काळात वर्णभेदाची मूळं खोल रुजली होती. त्यासाठी वर्णभेदी सरकारकडून विरोध करणाऱ्या राजकीय संघटना आणि कार्यकर्त्यांचा छळ केला जात होता, त्यांना तुरूंगात टाकलं जात होतं. पण त्यांच्यासाठी पिल्लई उभ्या राहिल्या आणि कायदेशीर लढा दिला.

पिल्लई यांनी १९७३ मध्ये त्यांनी राजकीय कैद्यांना वकिलाला भेटण्याचा हक्क मिळवून दिला. १९७० च्या दशकाच्या मध्यात त्यांनी सेठ कूपर आणि स्ट्रिनी मूडली यांसारख्या कृष्णवर्णीय जाणीव चळवळीच्या सदस्यांचा बचाव केला. सामाजिक कार्यात व्यस्त असताना पिल्लई यांनी शिक्षण काही सोडलं नाही. १९८२ मध्ये हार्वर्ड विद्यापीठातून कायद्याची पदव्युत्तर पदवी आणि १९८८ मध्ये न्यायशास्त्राची डॉक्टरेट मिळवली. इतकंच काय तर नेटाल विद्यापीठात अध्यापन केलं. तसेच डर्बन वेस्टविल विद्यापीठ परिषदेच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिलं.

# वाजतगाजत उमेदवारी अर्ज दाखल, मंगेश चिवटेंची शेवटच्या क्षणी माघार



**पुणे (प्रतिनिधी)–** विधान परिषदेच्या पदवीधर, शिक्षक मतदारसंघासाठीची रणधुमाळी सुरू झाली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असून अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या आहेत. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आणि एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय मंगेश चिवटे यांनी पुणे शिक्षक मतदारसंघातून माघार घेतली आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघाची जागाा भाजपच्या वाट्याला गेली असून, भाजपने कौस्तुभ गावडे यांची उमेदवारी घोषित केली. पुणे शिक्षक मतदारसंघातून राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांचे ओएसडीदेखील निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याची चर्चा सुरू होती. शिंदे गटाच्या नेत्यांनीदेखील हा मतदारसंघ शिवसेनेला सोडण्यात यावा असे म्हटले होते. मात्र, शिवसेनेने मंगेश चिवटे यांना एबी फॉर्म देत उमेदवारी जाहीर केली होती.

शिवसेना शिंदे गटाकडून मंगेश चिवटे हे उमेदवारीसाठी आग्रही होते. महायुतीच्या जागा वाटपात हा मतदारसंघ भाजपकडे गेला. मात्र, निवडणूक लढवण्यावर मंगेश चिवटे आग्रही होते. चिवटे यांनी बंडखोरीचे संकेतही दिले होते. शिवसेना शिंदे गटाकडून मंगेश चिवटे यांना एबी फॉर्म दिल्यानंतर त्यांनी आपला अर्ज दाखल केला. आपली उमेदवारी कायम राहिल असा विश्वास त्यांना होता. मात्र, उमेदवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या एक तासात चिवटे यांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

# एमपीएससी आंदोलनात उपोषण सोडताच ऋषिकेश गांगुर्डे, सोमनाथ चव्हाण, गजानन शेळकेसह १५ जणांविरोधात गुन्हा दाखल

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यातील एस.एम जोशी पूलावर आंदोलन करणाऱ्या १५ जणांविरुद्ध अखेर विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आंदोलन करण्यासाठी पोलिसांना पत्र दिल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, भेटीदरम्यान त्यांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या होत्या, त्यामुळे आंदोलन स्थगिती केल्याचे पत्र त्यांनी पोलिस आयुक्तांना दिले होते. परंतु सकारात्मक वाटाघाटी करून आल्यानंतरही कोणतीही पूर्वकल्पना न देता अचानक आंदोलन केले. सरकार विरोधात चितावणीखोर वक्तव्य करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि वाहतुकीस अडथळा करणे अशा विविध कलमांन्वये १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांमध्ये रोहित पवार यांचा समावेश नाही.

एस.एम. जोशी पुलाजवळ आंदोलन करण्याच्या तयारीत असलेल्या आणि सार्वजनिक रस्त्यावर आंदोलन केल्याचा आरोप असलेल्या १५ जणांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी अखेर गुन्हा दाखल केला आहे. पुण्यातील नवी पेठ परिसरातील इंदुलाल कॉम्प्लेक्ससमोर १ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांनी आंदोलन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. या आंदोलनामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्याचा तसेच जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थी प्रतिनिधी प्रमोद पाटील आणि इतर विद्यार्थ्यांनी आंदोलनासाठी परवानगी मिळावी म्हणून २५ सप्टेंबर रोजी पुणे पोलीस आयुक्त कार्यालयात निवेदन दिले होते. अलका टॉकीज चौक, अहिल्या अभ्यासिका आणि एस.एम. जोशी पूल या तीन ठिकाणी आंदोलन करण्याचा पर्याय त्यांनी मांडला होता. चर्चेनंतर एस.एम. जोशी पुलाजवळ २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता आंदोलन करण्यासाठी अटी व शर्तीसह परवानगी देण्यात आली होती. दरम्यान, ३० सप्टेंबर रोजी विद्यार्थी आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने मुंबईत मुख्यमंत्री यांची भेट घेतली. या भेटीत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली आणि मागण्या मान्य झाल्याने विद्यार्थ्यांनी २ ऑक्टोबरचे नियोजित आंदोलन स्थगित केल्याचे लेखी पत्र पोलीस आयुक्त कार्यालयाला दिले.

# मुंबई CSMT स्थानकावर बनावट रेल्वे ID कार्डचा पर्दाफाश!

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबई CSMT स्थानकावर तिकिट तपासणी अधिकाऱ्यांनी खोटं ओळखपत्र वापरणाऱ्या चोरट्याला पकडलं आहे. गुरुवार ८ ऑक्टोबर रोजी दुपारी मुंबई CSMT स्थानकावर तिकिट तपासणी अधिकाऱ्यांनी बनावट रेल्वे कर्मचाऱ्याच्या ओळखपत्राचा वापर करणाऱ्या प्रवाशाला ताब्यात घेतलं आहे. श्रेयस रावराणे असं या प्रवाशाचं नाव असून तो स्टेशनवर ज्युनियर इंजिनिअर म्हणून काम करत असल्याची त्याने पोलिसांना माहिती दिली आहे.

तिकिट तपासणी अधिकारी प्रसाद करालकर नेहमीप्रमाणे मुंबई उडचढ स्थानकावर प्रवाशांच्या तिकिट तपासणीचं काम करत होते. काम करत असताना प्रसाद यांच्यासमोर श्रेयस रावराणे सुद्धा आला. प्रसाद यांच्यासमोर श्रेयस आल्यानंतर त्यांनी त्याकडेही तिकिट विचारलं. त्याने तिकिट न दाखवता थेट रेल्वेचं ओळखपत्र दाखवलं. प्रसाद यांनी श्रेयसचं ओळखपत्र हातात घेतल्यानंतर त्यांच्या मनात शंका आली. त्यांनी हे ओळखपत्र खोटं असल्याचं सांगितलं. त्यानंतर ओळखपत्राची सत्यता पडताळल्यानंतर ते ओळखपत्र खोटं असल्याची माहिती समोर आली.

# मतदार यादीत नाव नोंदणीसाठी १२ ऑक्टोबरपर्यंतच मुदत; १० व ११ ऑक्टोबरला राज्यभरात विशेष शिबिरांचे आयोजन!

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, नाव वगळणे किंवा नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १२ ऑक्टोबर २०२६ ही असणार आहे. नवमतदारांसह ज्या पात्र नागरिकांचे नाव अजूनही मतदार यादीत नाही, त्यांना ही सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यासाठी १० आणि ११ ऑक्टोबर रोजी राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या संधीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेऊन अंतिम मतदार यादीत आपले नाव निश्चित करावे, असे आवाहन राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीनुसार राज्यभरात पुनरीक्षणाचे काम वेगाने सुरू आहे. ८ ऑक्टोबरपर्यंत प्राप्त माहितीनुसार, नवीन नाव नोंदणीसाठी (नमुना-६) तब्बल ७ लाख १९ हजार ३८२ नागरिकांनी अर्ज दाखल केले आहेत. याशिवाय मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी (नमुना-८) ३ लाख ९९ हजार ९२५, तर नावे वगळण्यासाठी (नमुना-७) १८ हजार ७४८ अर्ज प्रशासनाकडे प्राप्त झाले आहेत.

१ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकास किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेले नवमतदार आणि पात्र असूनही मतदार यादीत नाव नसलेले नागरिक नमुना-६ भरून आपले नाव नोंदवू शकतात. त्यासाठी आवश्यक ती घोषणापत्रे आणि कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे.

नागरिक आपले अर्ज संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी किंवा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्ष जाऊन सादर करू शकतात. याशिवाय १० व ११ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विशेष शिबिरांमध्येही हे अर्ज स्वीकारले जातील. ज्यांना घरबसल्या ऑनलाईन अर्ज करायचा आहे, ते भारत निवडणूक आयोगाच्या https://voters.eci.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन नोंदणी करू शकतात.


## Change In Name

My old Name is **CHOUDHARI ASHRAFALI MAHEMOOD** Which now I am Changing as New Name **ASHRAF MAHEMOOD CHOUDHARY.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: Mahemood choudhary 9-6-1455 degloor naka iqbal nager itwara nanded S.o nanded maharshtra 431604**

## Change In Name

My old Name is **SK SHOAIBANWAR SK AKBAR ATTAR** Which now I am Changing as New Name **SHAIKH SHOAIB ANWAR.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: shaikh akbar attar,9-9-78 bondhar road, ikbal nagar,itwara nanded ,nanded maharashtra 431604**

## टी.सी. हरवली

माझी केंद्रे शुभम दगडु या नावाची बारावी पासची ब्रम्हेश्वर कनिष्ठ महाविद्यालय बामणी ता. जिंतूर जि. परभणी या महाविद्यालयाची टी. सी. लातूर फाटा ते सिडको ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.– **संपर्क पत्ता – शुभम दगडु केंद्रे रा. सिडको, नांदेड**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## Change In Name

My old Name is SUMESH SURESH DHOOT

which now I am changing as new Name SUMESH SURESHKUMAR DHOOT

Henceforth, My all correspondence will be done As per

my new Name. Please consider the same.

ADDRESS

R/O H NO 5-4-62 MARWAD GALLI SARAFA ITWARA NANDED - 431604

## Change In Name

My old Name is **YASMIN MAKBUL MUJAWAR** Which now I am Changing as New Name **KHAN YASMEEN GAFFAR KHAN.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: DEGLUR NAKA, TAYAR BORD BILAL NAGAR, NANDED-431604 Mob: 8421821134

## Change In Name

My old Name is **MD. SAJID MD. MUSA** Which now I am Changing as New Name **MOHAMMED SAJID MOHAMMED MOOSA.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: Shobha Nagar, Police Colony, Taroda Bk., Taroda Bk. Nanded Maharashtra**

## Change In Name

My old name is **Karima Begum** hich now I am changing as new name **karimabi** hence forth my all correspondence will be done as per my name please consider the same

**SING BY - KARIMABI KUNDALWADI BILOLI NANDED 9325107547**

## Change In Name

My old name is **Shaikh Mukhtar hich** now I am changing as new name **Sheikh Mukhtar Khajaminya** hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same

**SING BY - SHAIKH MUKHTAR KHAJAMINYA KUNDALWADI BILOLI NANDED 9766414421**

## जाहिर प्रगटन

**नांदेड वाघाळा शहर म.न.पा. हद्दीतील मौजे रहीमपुर खु.नांदेड येथिल शेत गट नं. 02 पैकी एक प्लॉट नं. 15 संबंधी**

दिनांक :- 30/09/2026

माझे पक्षकार 1) शेख मुस्तफा सलीम शेख व 2) मोहम्मद समीर मोहम्मद नबी, दोघे रा.रहीमपुर वसरणी नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहिर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकाराने 1) सचिन राजकुमार लोहाना 2) करण गोवर्धन लोहाना व 3) पवन जिवतराम चंदनानी सर्व रा.नांदेड यांच्या जाती मालकी व ताब्यातील नांदेड वाघाळा शहर म.न.पा. हद्दीतील मौजे रहीमपुर खु.नांदेड येथिल शेत गट नं. 02 पैकी एक प्लॉट नं. 15 असुन ज्याची रुंदी दक्षिण उत्तर 30 फुट आहे व लांबी पुर्व-पश्चिम 80 फुट आहे ज्याचे एकुण क्षेत्रफळ 2400 चौ.फुट आहे. ज्याची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| पुर्वेस | : उस्माननगर रोड आहे. | पश्चिमेस | : प्लॉट नं.18 आहे. |
| दक्षिणेस | : प्लॉट नं. 14 आहे. | उत्तरेस | : प्लॉट नं.16 आहे. |

सदर चतु:सिमे आतील प्लॉट हे माझे पक्षकाराने खरेदी करण्याचा करार केला असुन बयाणा पोटी रक्कम दिली आहे व लवकरच रजिस्ट्री विक्रीखत करून घेणार आहेत.

जर वरील व्यवहारास कोणाचे काही अक्षेप, उजर असल्यास त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून 07 (सात) दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर आपले लेखी आक्षेप नोंदवावे. मुद्दतीच्या आत कोणाचे आक्षेप आले नाही तर कोणाचे कांही आक्षेप नाही असे गृहीत धरुन माझे पक्षकार रजिस्ट्री विक्रीखत करुन घेतील व मुद्दतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

करीता हे प्रगटन.

जाहिर प्रगटन देणार

मार्फत

ॲड.इम्राण खान पठाण
जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड
मो.नं. 9423759079

1) शेख मुस्तफा सलीम शेख
मो.क्रं.7385559502

2) मोहम्मद समीर मोहम्मद नबी,
दोघे रा.रहीमपुर वसरणी नांदेड
मो.नं.9822099732

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व हितसंबंधीतास या जाहीर प्रगटना द्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार सौ. जयाबाई भ्र. गोविंदराव राठोड, वय- ६७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. शिकारा तांडा पो. शिकारा ता. मुखेड जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकाराबरुन मी आपणास व सर्व जनतेस खाली प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे. माझ्या पक्षकाराने सौ. शिवगंगाबाई भ्र. देविदासराव चट्टे, वय-५३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. नंदगांव (प.क.) ता. मुखेड जि. नांदेड त्यांच्या मालकी हक्कव व ताब्यातील प्लॉट कायमचा खरेदी करण्याच्या उद्देशाने व्यवहार झालेला आहे.

**सदरील प्लॉटच्या भागाचे वर्णन-**

तु.व जि. पोट तु.व ता.जि. प.ता.प.स. नांदेड ग्रांम पंचायत वाडी बु. ता. जि. नांदेड पैकी मौजे वाडी बु. येथील शेत सर्वे नं. ७५ पैकी एक प्लॉट ज्याचा प्लॉट नं. ३२ चा उत्तरेकडील भाग आहे. ज्याची लांबी पुर्व-पश्चिम ४० फुट म्हणजे १२.१९ मी. आहे व रुंदी दक्षिण-उत्तर १५ फुट म्हणजे ४.५७ मी आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ ६०० चौ.फुट म्हणजे ५५.७६ चौ.मी. आहे.

**ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.**

पुर्वेस - प्लॉट नं. ३८ चा भाग आहे.
पश्चिमेस- २० फुट रुंद रोड आहे.
दक्षिणेस- सदर प्लॉट नं. ३२ चा भाग आहे.
उत्तरेस- प्लॉट नं. ३१ आहे.

या वर्णनाची मालमत्ता अंतरीक व बाहयहक्कासह माझ्या पक्षकाराने व्यवहार केला असुन सदर व्यवहारा पोटी बयाना म्हणुन काहीर इसार (बयाना) रक्कम दिली आहे व उर्वरीत रक्कम देवुन माझे पक्षकार स्वतःच्या हक्कात नोंदनिकृत खरेदीखत करुन घेण्याचे ठरले आहे. वरील मिळकतीच्या खरेदी विक्री व्यवहारा बद्दल कोणाचा काही आक्षेप, उजर, भाऊ बंधकी न्यायालयीन प्रकरण, शासकिय अथवा निमशासकीय बँकेचे कर्ज, बोझा, गहाण, तारण इत्यादी प्रकारचा अक्षेप असेल तर त्यांनी आपला लेखी आक्षेप खालील जाहीर प्रगटण देणार यांचे कडे हे जाहीर प्रगटण प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाच्या आत देवुन रितसर पोच घ्यावी आणि मुदतीत कोणाचा आक्षेप नाही आला तर सदरील प्लॉटच्या खरेदी- विक्री व्यवहारास कोणाचाही काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदरील मिळकतीचा उर्वरीत व्यवहार पुर्ण करुन नोंदनीकृत खरेदीखत स्वतःच्या नावे करुन घेतील आणि मुद्दती नंतर आलेला आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. याची सर्व जनतेनी आणि संबंधीतांनी नोंद घ्यावी. करीता हे जाहीर प्रगटण.

**मार्फत – ॲड. चेतन उत्तमराव चव्हाण,** नरसिंहनगर उमरदरी, मुखेड मो. क्र. ९९७५०७४४५४.

**जाहीर प्रगटण देणार-** सौ. जयाबाई भ्र. गोविंदराव राठोड रा. शिकारा तांडा पो. शिकारा ता. **मुखेड जि. नांदेड**

मो.क्र. ९६५७८९८९०९, ८३९०८६५००७.

## Change In Name

My Old Name is **AREEBA SHAHMEER ABDUL AZIZ.** Now I am Changing as a New Name **AREEBA SHAHEMEER ABDUL AZIZ.** Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

**Address - 1-16-211 NOORANI MASJID SUNDAR NAGAR NANDED, NANDED, NANDED, MAHARASHTRA Mo. No. 9423543517**

## Change In Name

My Old Name is **ABDUL MUQTADAR.** Now I am Changing as a New Name **ABDUL MUQTADIR.** Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

**Address - 1-16-211 NOORANI MASJID SUNDAR NAGAR NANDED, NANDED, NANDED, MAHARASHTRA Mo. No. 9423543517**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## वॉटर फिल्टर प्लांटमधील पाण्याचा पुनर्वापर करा

◆ जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे वॉटर प्लांट चालकांना आवाहन

◆ प्लांटचे सर्वेक्षण करून माहिती सादर करण्याचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** अल्-निनोचा संभाव्य प्रभाव आणि दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. यासाठी वॉटर फिल्टर प्लांटमधून प्रक्रियेदरम्यान वाया जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करावा, तसेच हे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी आणि गरजू नागरिकांच्या दैनंदिन वापरासाठी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ८ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील पॅकेज्ड पिण्याच्या पाण्याचे उत्पादन व विक्री करणाऱ्या वॉटर असोसिएशनच्या सदस्यांची बैठक झाली. या बैठकीत पाण्याचा अपव्यय रोखणे आणि त्याच्या पुनर्वापराच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यात एक लिटर पॅकेज्ड पाण्याचे उत्पादन करणाऱ्या युनिटची संख्या मर्यादित असून, त्यामध्ये वाया जाणाऱ्या पाण्याचे प्रमाणही कमी आहे. मात्र, २० लिटरच्या फिल्टर पाण्याच्या जारची विक्री करणारे सुमारे ३५० ते ४०० युनिट जिल्ह्यात कार्यरत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.



या प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर नांदेड शहर आणि शहरालगतच्या परिसरातील सर्व परवानाधारक तसेच विनापरवानाधारक वॉटर फिल्टर प्लांटचे सर्वेक्षण करून त्यांची माहिती सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिले.

**पाण्याच्या पुनर्वापरासाठी उपाययोजना करा**

**शोषखड्ड्यांद्वारे भूजल पुनर्भरण :** वॉटर फिल्टर प्लांटमधून प्रक्रियेदरम्यान बाहेर पडणारे पाणी शोषखड्डे तयार करून जमिनीत मुरवावे. यामुळे भूजल पुनर्भरणास मदत होईल. प्रक्रियेदरम्यान वाया जाणाऱ्या पाण्याचा इतर योग्य कामांसाठी जास्तीत जास्त पुनर्वापर करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे.

वाया जाणारे पाणी मोठ्या टाकीत साठवून ठेवावे. पाण्याच्या गुणवत्तेनुसार आणि योग्य वापरासाठी आवश्यक खबरदारी घेऊन हे पाणी परिसरातील गरजू नागरिकांना कपडे धुणे, भांडी घासणे, स्वच्छता आदी कामांसाठी उपलब्ध करून द्यावे. यामुळे पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो.

**पाणी बचतीसाठी सामाजिक जबाबदारी पार पाडा**

आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, प्रक्रियेदरम्यान होणारा अपव्यय रोखणे आणि वाया जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व परवानाधारक व विनापरवानाधारक वॉटर प्लांट चालक तसेच विक्रेत्यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून पाणी बचतीसाठी तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना नांदेडमध्ये श्रद्धांजली

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय चित्रपटसृष्टीचे अजोड व्यक्तिमत्त्व. भारदस्त आवाज आणि परखड अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरुवारी निधन झाले. त्यांना नांदेड येथील त्यांच्या चाहत्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या पाच दशकांच्या कारकिर्दीत 'परिंदा', 'क्रांतीवीर', 'अंकुश', 'प्रहार', तिरंगा आणि मराठीतील अजरामर 'नटसम्राट' यांसारख्या चित्रपटांतून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले.




केवळ पडद्यावरचे हिरोच नव्हे, तर 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणारे ते एक खरेखुरे समाजसेवकही होते. त्यांच्या निधनाने सिनेसृष्टीचे आणि सामाजिक क्षेत्राचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे. दि. ८ ऑक्टोबर रोजी नांदेडमधील वसंतनगर येथे एक शोकसभा आयोजित करून ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी राहुल वाघमारे, साहित्यिक सोनू दरेगावकर, प्रा. शिवाजी सूर्यवंशी, दत्तप्रसाद तालीमकर, विनोद पाचंगे आणि लहुदास भालेराव यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

### नांदेडमध्ये अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

## दोन हायवांसह ८५.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत नांदेड पोलिसांनी दोन मोठ्या कारवाया करत अवैध वाळूसह दोन हायवा असा ८५ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्री नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथक विष्णुपुरी ते वाडीपाटी परिसरात गस्त घालत होते. मार्कंड पाटीजवळ एका हायवातून अवैध रेती वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

पोलिसांनी पंचांसह सापळा रचून हायवा ट्रक (क्र. MH २६ CH ९२१३) थांबवला. तपासणीत त्यात ५ ब्रास अवैध रेती (किंमत २५ हजार रुपये) आढळली. चालकाकडे रॉयल्टी किंवा वाहतूक परवाना नव्हता.

पोलिसांनी ट्रक (४० लाख रु.) व रेती (२५ हजार रु.) असा एकूण ४० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी चालक बालाजी मोहनराव राठोड (वय २४, रा. बाभुळगाव तांडा) व ट्रक मालकाविरुद्ध नांदेड ग्रामीण पो. स्टे. येथे गु.र.नं. १३०९/२०२६ कलम ३०३(२) BNS सह कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहितेन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक अशोक जाधव, उपनिरीक्षक साळुंके, अंमलदार विठ्ठल भिसे, गफार शेख, कल्याणकर, टिपरसे, पवार व तेलंग यांनी पार पाडली.

**दुसरी कारवाई: बारड पोलिसांची – ४५.२५ लाख जप्त**

दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी बारड पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनि दत्तात्रेय मंठाळे यांच्या पथकाला रेल्वे पाथरड- देगाव रोडवर अवैध रेती वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. पथकाने हायवा (क्र. चक-२६ ऊ-११७७) थांबवून पाहणी केली असता त्यात ५ ब्रास रेती आढळली. परवाना नसल्याने पोलिसांनी हायवा (४५ लाख रु.) व ५ ब्रास रेती (२५ हजार रुपये.) असा एकूण ४५ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी आरोपी राम शत्रुघ्न सोनटक्के (वय २०, रा. ब्राह्मणवाडा) याच्याविरुद्ध बारड पो.स्टे. येथे गु.र.नं. १३२/२०२६ कलम ३०३(२) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सपोनि मंठाळे, अंमलदार दत्तात्रय देशमुख व भाडेकर यांनी पार पाडली.

## रत्नेश्वरी गडावर नवरात्र महोत्सवाची जय्यत तयारी; ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापना

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील प्रसिद्ध आणि जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वडेपुरी येथील माता रत्नेश्वरी देवीच्या गडावर नवरात्र महोत्सवाची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता विधिवत पूजाअर्चा, अभिषेक आणि घटस्थापनेने नवरात्र महोत्सवाला प्रारंभ होणार आहे.



नवरात्र महोत्सवानिमित्त रत्नेश्वरी गडावर रंगरंगोटी आणि आकर्षक सजावट करण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दर्शनासाठी रांगेचे नियोजन तसेच स्वच्छता व इतर आवश्यक सुविधांकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. यात्रेकरूंना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

रविवारी सकाळी ११ वाजता माता रत्नेश्वरी देवीची विधिवत पूजा व अभिषेक करून घटस्थापना करण्यात येईल. त्यानंतर महाआरती होणार आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ परिसरातील तसेच जिल्ह्यातील जास्तीत जास्त भाविकांनी घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

नवरात्र महोत्सवाच्या नियोजनासाठी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष शिवाजी पाटील दळवे, सचिव साहेबराव झांबरे, विश्वस्त सदाशिव आंबुरे, सदाशिव स्वामी, माधवराव धर्माधिकारी, जनार्दन मामीडवार, व्यंकटराव मुळे, जवळेकर देशमुख यांच्यासह ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

## दारूबंदीच्या नावाखाली धुडगूस; राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दुय्यम निरीक्षकाचा प्रताप

◆ हात फ्रॅक्चर असलेल्या खानावळीतील कर्मचाऱ्याला बेदम मारहाण ◆

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** दारूबंदीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागातील एका दुय्यम निरीक्षकावरच आता दादागिरी, मारहाण आणि हॉटेल व्यावसायिकांकडून कथित 'हप्ते' वसुलीचे गंभीर आरोप झाले आहेत. अधिकार क्षेत्रात नसतानाही सिडको परिसरातील शासकीय दूध डेअरीजवळील एका मटण खानावळीत जाऊन, तेथे दारू विक्रीचा आरोप करीत कर्मचाऱ्यांना धमकावणे, 'फुकट जेवण' मागणे आणि हाताला फ्रॅक्चर झालेल्या कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केल्याचा आरोप खानावळीच्या मालकाने केला आहे. या प्रकारामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

गुरुवारी सायंकाळी हा धक्कादायक प्रकार घडल्याचे सांगण्यात येते. महिला दुय्यम निरीक्षक रेणुका सलगर यांच्या पथकासोबत अधिकार क्षेत्र नसतानाही अवैध पद्धतीने गेलेल्या दुय्यम निरीक्षक सचिन शेटे यांनी संबंधित खानावळीत प्रवेश केला. खानावळीचा मालक त्या वेळी उपस्थित नसताना 'तुम्ही दारू विकता' असा आरोप करीत कर्मचाऱ्यांशी हुज्जत घातल्याचे मालकाचे म्हणणे आहे. त्यानंतर हाताला आधीच फ्रॅक्चर असलेल्या एका कर्मचाऱ्याला बेदम मारहाण करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार हॉटेलमध्ये असलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाला आहे.

इतकेच नव्हे तर खानावळीतील साहित्य अस्ताव्यस्त फेकून देण्यात आले आणि तेथील वृद्ध महिला कर्मचाऱ्यालाही शिवीगाळ करण्यात आल्याचा आरोप आहे. या संपूर्ण प्रकाराचे सीसीटीव्ही चित्रण उपलब्ध असल्याचा दावा खानावळीच्या मालकाने केला आहे.

**'हप्ते देत नाही, फुकट जेवण देत नाही म्हणून त्रास?'**



या घटनेनंतर खानावळीच्या मालकाने संबंधित अधिकाऱ्याला जाब विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यावेळी 'तुम्ही आम्हाला हप्ते देत नाही', 'कर्मचाऱ्यांना आणि आमच्या मित्रांना फुकट जेवण देत नाही', 'तुम्हाला तक्रारी करायच्या असतील तर करा; आमचे कोणीही वाकडे करू शकत नाही', अशा स्वरूपाची उद्धट उत्तरे मिळाल्याचा आरोप मालकाने केला आहे.

शहरातील काही हॉटेल व ढाबा व्यावसायिकांना संबंधित अधिकारी त्रास देत असल्याच्या तक्रारीही चर्चेत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे दारूबंदीच्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या नावाखाली अधिकाराचा गैरवापर तर होत नाही ना, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

**कायद्याची अंमलबजावणी की 'खाऊगिरी'ची वसुली?**

दारूबंदीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार असलेल्या यंत्रणेतील अधिकाऱ्यानेच जर हॉटेल व्यावसायिकांवर दबाव टाकला, मारहाण केली किंवा कथितरीत्या मोफत जेवण व हप्त्यांची मागणी केली असेल, तर हा प्रकार केवळ एका खानावळीपुरता मर्यादित राहत नाही. तो संपूर्ण राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारा ठरतो.




**नांदेड –** छत्रपती शिवाजी महाराजांचे शूर शिलेदार शिवरत्न जिवाजी महाले यांच्या ३६१ व्या जयंतीनिमित्त शिवरत्न जिवाजी महाले शौर्य पुरस्कार २०२६ डॉ. श्रावण रॅपनवाड यांना देण्यात आला. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण, खा. रामराव वडकुते, माजी मंत्री डी. पी. सावंत, आमदार व महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, आ. आनंदराव पाटील बोंढारकर, आ. बालाजी कल्याणकर, महापौर सौ. कविता मुळे, जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालिका सौ. संगिता पाटील डक, बिशन यादव, स्मारक समिती अध्यक्ष गोविंद दळवी, जयंती उत्सव समिती अध्यक्ष संजय मोगडपल्ले, सचिव अशोक खोडके, उपाध्यक्ष बाळू गायकवाड, उपाध्यक्ष श्याम जाधव, कोषाध्यक्ष सतिशचंद्र शिंदे, अशोक कुबडे, संदीप डेरलेकर, शूर शिलेदार शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस, नरेंद्र गडप्पा नांदेड)**

## पत्रकार दिलीप वाघमारे यांना मातृशोक

**नायगाव (प्रतिनिधी) –** नरसी (ता. नायगाव) येथील ज्येष्ठ महिला श्रीमती पार्वतीबाई माधवराव वाघमारे यांचे शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता नरसी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात कंत्राटदार प्रमोद वाघमारे, प्रा. डॉ. अशोक वाघमारे, पत्रकार दिलीप वाघमारे, राजू वाघमारे हे चार पुत्र, सुना, नातू, नाती असा परिवार आहे.

## 'तो' पोलीस निलंबित; नांदेड ग्रामीण हद्दीत वाळू माफियाने केली होती मारहाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** असर्जन परिसरात घडलेल्या घटनेनंतर पोलीस दलातील कर्मचाऱ्याच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. ही घटना नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत, पुलाचे बांधकाम सुरू असलेल्या परिसरात घडल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकरणात पोलीस अंमलदार माधव डफडे यांचे नाव समोर आले असून, त्यांच्यावर झालेल्या कथित मारहाणीच्या आरोपामुळे आणि त्यानंतर झालेल्या निलंबनाच्या कारवाईने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, माधव डफडे यांची यापूर्वी लोहा, हदगाव आणि नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात नियुक्ती होती. त्यानंतर त्यांची बदली एक वर्षापूर्वी मुदखेड येथे झाली होती.

या प्रकरणात वाळूमाफिया, कथित वसुली असा सवालही उपस्थित केला जात आहे. पोलीस अधीक्षक डॉक्टर निलाभ रोहन यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन त्यांना सर्वप्रथम पोलीस मुख्यालयात बोलावून घेतले आणि त्यानंतर निलंबनाचा आदेश जारी केल्याने खळबळ उडाली आहे.

निलंबित केलेले पोलीस कर्मचारी माधव डफडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी वरील मारहाणीचा प्रकार झालाच नाही. वसुली आणि वाळू या संबंधात माझा कुठेही संबंध येत नाही. मी एक वर्षांपूर्वी मुदखेड पोलीस ठाण्यात कार्यरत आहे. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी मारहाण झाल्याचे रंगवण्यात आले त्या ठिकाणी माझे स्वतःचे घर आहे व मी घरून नारळ पाणी आणण्यासाठी भगतसिंग चौकात येत असताना संबंधिताने वाद उकरून काढत मला शिवीगाळ केली, परंतु या प्रकरणाला वसुलीवरून वाळू माफियाने मारहाण केल्याचे दाखविण्यात आले हे अत्यंत चुकीचे आहे. या प्रकरणात मी माझी भूमिका मांडण्यासाठी लवकरच पोलीस अधीक्षक यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## मधुकर लाभशेटवार यांचे निधन

**नायगाव (प्रतिनिधी)–** नरसी येथील ज्येष्ठ नागरिक मधुकर माधवराव लाभशेटवार बावलगावकर यांचे गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.५० वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी रात्री ८.१० वाजता नरसी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातू, पंतू असा मोठा परिवार आहे. ते नरसी येथील प्रसिद्ध उद्योजक विठ्ठल सावकार लाभशेटवार व सुधाकर सावकार लाभशेटवार यांचे वडील होत.



## जिवाजी महाले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याची काँग्रेसची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी) –** छत्रपती शिवाजी महाराजांचे शुरशिलेदार शिवरत्न जिवाजी महाले यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या उपस्थितीत शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शिवरत्न जिवाजी महाले यांचा पूर्णाकृती पुतळा नवीन कौठा येथे उभारण्यात यावा अशी मागणी शुक्रवार दि. ९ रोजी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.




शिवरत्न जिवाजी महाले यांच्या नावाने नवीन कौठा येथे महानगरपालिकेचा वतीने अधिकृत चौक असून याठिकाणी पूर्णाकृती पुतळा व्हावा यासाठी २०१२ मधील मनपातील तत्कालीन काँग्रेस महापौर अब्दुल सत्तार व उपमहापौर आनंद चव्हाण यांच्या नेतृत्वात ठराव मंजूर करण्यात आला होता. दरम्यान मनपा निवडणूक २०२६ मध्ये काँग्रेस-वंचित आघाडीने जाहीरनाम्यात देखील पुतळा उभारण्यासाठी संकल्प नमूद केला होता. दरम्यान या पुतळा संदर्भात पाठपुरावा करण्याची विनंती सिडको ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांनी केली होती. दरम्यान जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष तथा माजी उपमहापौर अब्दुल गफ्फार यांच्या उपस्थितीत शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शिवरत्न जिवाजी महाले यांचा पूर्णाकृती पुतळा नवीन कौठा येथे उभारण्यात यावा अशी मागणी शुक्रवार दि. ९ रोजी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी माजी उपमहापौर आनंद चव्हाण, डॉ. रेखा चव्हाण, नगरसेवक सय्यद शोएब, मुन्ना अब्बास हुसैन, पाशा शेख, सत्यपाल सावंत, सुरेश हटकर, फेरोज खोकेवाले, ॲड. शहबाज, ब्लॉक अध्यक्ष बापूसाहेब पाटील, दीपकसिंग हुजारिया, मुन्ना देशमुख तरोडेकर, सय्यद रिहान, अंबादास रातोळे, नागराज सुलगेकर, गोविंद पाटील, अजर शेख, धनंजय उमरीकर आदी उपस्थित होते.

## भगवानराव पवार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी प्रकाश पवार यांचे वडील भगवानराव भीमराव पवार सातेगावकर यांचे शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी ७.४५ वाजता निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता सातेगाव तालुका नायगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## गाडेगाव येथील महादेव मंदिर फोडले; चोरटा सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरापासून जवळच असलेल्या कामठा-गाडेगाव रस्त्यावर रेल्वे उड्डाणपूल शेजारी असलेले महादेव मंदिरात अनोळखी चोरट्याने प्रवेश केला. यावेळी त्याने दानपेटी फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र तो असफल ठरला. त्यानंतर त्याने ॲम्प्लिफायर व अन्य साहित्य चोरून नेले.

या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली असून तपास पोलीस अंमलदार राणे यांच्याकडे देण्यात आला आहे.



कामठा ते गाडेगाव रस्त्यावर रेल्वे उड्डाणपूल शेजारी गाडेगाव येथील समाजसेवक तथा व्यापारी हनुमंत उबाळे यांनी आपल्या शेतात मंदिर उभारले. मुख्य रस्त्याच्या कडेला असलेल्या या जागृत देवस्थानाला या परिसरातील नागरिक व वाटसरू मोठ्या प्रमाणात दर्शन घेण्यासाठी थांबतात. हे मंदिर गुरुवार दि. ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास अनोळखी चोरट्याने फोडून आत प्रवेश केला. गाभाऱ्यात प्रवेश केल्यानंतर दानपेटी चोरण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यात त्याला यश आले नाही. अखेर त्याने आपला मोर्चा कपाटात ठेवलेल्या ॲम्पलीफायर व अन्य साहित्याकडे वळविला आणि ॲम्प्लिफायर व अन्य साहित्य चोरट्याने घेऊन मंदिराचा दरवाजा बंद करून पोबारा केला.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com